बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शुक्रवार,दि.६ जून २०२५ | वर्षे४थे | अंक२८८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# घोटाळेबाज साईराम अर्बनच्या प्रॉपर्टीवर टाच!

**५३ कोटींची संपत्ती सील करण्यासाठी प्रस्ताव**

**खातेदारांना डुबवून पतसंस्था होती सैराट**

**खातेदारांना अडकलेला पैसा मिळण्याची अपेक्षा**

**नागरिकांनो पैसा गुंतवणूक राष्ट्रीय प्रत बँकेतच करा**

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:आर्थिक अनियमिततेनंतर बंद पडलेल्या साईराम अर्बन मल्टिस्टेट पतसंस्था प्रकरणात अध्यक्ष व संचालकांच्या ५३ कोटींच्या मालमत्तांचा एमपीआयडीचा प्रस्ताव शासनाकडे आर्थिक गुन्हे शाखेने पाठवला आहे. तर, जिजाऊ मल्टिस्टेटचाही ३ कोटींच्या मालमत्तांचा पुरवणी प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे पैसे मिळण्याच्या ठेवीदारांच्या अशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

बीड जिल्ह्यात मागील दोन वर्षांत अनेक सहकारी पतसंस्था आणि अर्बन मल्टिस्टेट पतसंस्थांमध्ये घोटाळे झाले आहेत. ज्ञानराधा, जिजाऊ, साईराम, राजस्थानी या प्रमुख पतसंस्थांचे घोटाळे मोठ्या प्रमाणावर गाजले. बीड येथील साईराम मल्टिस्टेटमध्येही नोव्हेंबर २०२३ मध्ये आर्थिक नियमितता समोर आली होती. साईरामपूर्वी जिजाऊ, ज्ञानराधा या मोठ्या पतसंस्था बुडाल्याने ठेवीदारांनी साईराम अर्बनमधूनही ठेवी काढण्यासाठी गर्दी केली होती. साईराम अर्बनच्या बीड, जालना, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २१ शाखा होत्या. जिजाऊ मल्टिस्टेट प्रकरणात यापूर्वीच एमपीआयडीचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. मात्र त्यात बबन शिंदे व कुटुंबीयांच्या काही मालमत्तांचा समावेश नव्हता. कृती समितीने ही बाब आर्थिक गुन्हे शाखेच्या




निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर पुन्हा ३ कोटींच्या ६ मालमत्तांचा पुरवणी प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवला गेला आहे. जिल्ह्यात जिजाऊ, ज्ञानराधा या पतसंस्थांचे एमआयडीचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. जिजाऊ व ज्ञानराधाच्या काही मालमत्तांची जप्ती झाली असून त्यांच्यावर बोजा चढवला गेला आहे. मात्र आता या मालमत्तांचा लिलाव कधी होणार, प्रत्यक्षात ठेवीदारांना पैसे कधी मिळणार, याकडे ठेवीदारांचे लक्ष लागले आहे. यातील १६ शाखा बीड जिल्ह्यात होत्या. २०० कोटी रुपयांच्या ठेवी या पतसंस्थेत होत्या. पतसंस्था आर्थिक अडचणीत सापडल्यानंतर अध्यक्ष शाहीनाथ परभणे यांनी अनेक ठेवीदारांच्या ठेवी परत केल्या. मात्र, ठेवी मागण्याचे सत्र सुरूच असल्याने शेवटी एक-एक करत पतसंस्थेच्या सर्व शाखा बंद पडल्या. शाहीनाथ परभणे व संचालकांवर गुन्हा नोंदीचे सत्र सुरू झाले. सुरुवातीला व्हिडिओच्या माध्यमातून सोशल मीडियातून दिसणारे परभणेही शेवटी फरार झाले होते. ९ महिन्यांपूर्वी शाहीनाथ परभणे, विनायक परभणे आणि कुणाल परभणे यांना आर्थिक गुन्हे शाखेने पुण्यातून अटक केली होती. ठेवीदार हित संरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंद झाल्यामुळे अध्यक्ष, संचालक यांची मालमत्ता शोधून त्याच्या विक्रीसाठी व जप्तीसाठी आर्थिक गुन्हे शाखेकडून प्रयत्न सुरू होते. एमपीआयडीचा प्रस्ताव पाठवण्यासाठी ठेवीदारही पाठपुरावा करत होते. अखेर आर्थिक गुन्हे शाखेने ५३ कोटींच्या मालमत्ता शोधून काढल्या असून त्यांचा प्रस्ताव पाठवला आहे. पतसंस्थेच्या मालमत्तेचा लिलाव झाल्यास ठेविदारांना लवकर ठेवी मिळू शकतील, त्यामुळे जिल्ह्यातील ठेविदारांच्या आशा - अपेक्षा आता वाढल्या आहेत.

## मुंबईच्या किनाऱ्यावर स्वच्छतेचा जागर!

### मंत्री पंकजा मुंडे: एकल प्लास्टिकचा वापर रोखण्याचे आवाहन



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबईः जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मंत्रालयात आयोजित विशेष कार्यक्रमात मंत्रालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी एकल प्लास्टिकचा त्याग करून कापडी पिशव्या वापरण्याचा संकल्प केला. मंत्रालयातील प्रत्येक विभाग एकल प्लास्टिक मुक्त झाले पाहिजे असा प्रयत्न आहे. त्यासाठी मंत्रालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी केले. पर्यावरणाचे महत्त्व ओळखून त्याचे संवर्धन करण्यासाठी काय उपाययोजना करायला हव्यात यासाठी मंत्रालयात पहिल्यांदाच अशा प्रकारचा एकल वापर प्लास्टिक निर्मूलन करण्याचा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव एन रामस्वामी, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल आदी उपस्थित होते.

यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी उत्स्फूर्तपणे तयार केलेली वापरातील एकल प्लास्टिकचा वापर टाळण्याची शपथमंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यांना दिली. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांना कापडी पिशव्यांचे यावेळी वाटप करण्यात आले. श्रीमती मुंडे म्हणाल्या की, पर्यावरणाचे संवर्धन हा एक महत्त्वाकांक्षी विषय असून आपण सर्वांनीच पर्यावरणाच्या संवर्धनाची आवड जोपासणे आवश्यक आहे. शासकीय व खाजगी कार्यालयात सर्व कामकाजात कागद मोठ्या प्रमाणात वापरला जातो, म्हणून पर्यावरण संवर्धनासाठी आपण सर्वप्रथम मंत्रालयातील कामकाज कागद विरहित करून आपले पहिले पाऊल उचलूयात. पर्यावरणाबद्दलची ही जनजागृती आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रभर पसरवायची आहे. इतरांना जागृत करण्यासाठी आपण सर्वप्रथम आपण जागरूक पान २ वर

## मोठीवाडीची महिला सरपंच आणि महिला सदस्य अपात्र

### निर्णय: विभागीय आयुक्तांकडून स्थगिती अर्ज अमान्य

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:तालुक्यातील मोठ्या समजल्या जाणाऱ्या मोठीवाडी ग्रामपंचायतचे सरपंच सत्यभामा मारुती दळवी(सासु) आणि महिला सदस्य उषा अशोक दळवी(सुन) हे अखेर विभागीय आयुक्त. छत्रपती संभाजीनगर यांच्या दालना मध्ये जिल्हाधिकारी यांच्या निकालाच्या विरोधात स्थगिती मिळावी म्हणून अर्ज करण्यात आला होता. याविषयी सविस्तर वृत्त असे की, या अर्जावर दिनांक २० जुलै २०२५ रोजी सुनावणी पार पडली सदरील सुनावणीचा निकाल आयुक्तांनी राखीव ठेवला होता. दिनांक २९ मे २०२५ रोजी आयुक्तांनी निकाल जाहीर केला व सरपंच सत्यभामा मारुती दळवी आणि सदस्य उषा अशोक दळवी यांचे अपील फेटाळण्यात (अमान्य) आले म्हणजेच जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी असे म्हटले आहे की, शासनाच्या जागेवर अपिलार्थी यांनी अतिक्रमण करून घराचे व शौचालयाचे बांधकाम केलेले असल्याचे जिल्हाधिकारी यांच्या निष्कर्षामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे. यामुळे जिल्हा अधिकारी यांच्या निर्णयास स्थगिती देण्यासाठी आवश्यक सबळ कारण नसल्याने हा निर्णय देण्यात पान २ वर

## ट्रॅक्टर चोरी करणाऱ्या टोळीतील चार आरोपी जेरबंद

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड : चिंचवण येथून चोरी केलेल्या ट्रॅक्टरसह चोरणाऱ्या चार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जेर बंद करून ट्रॅक्टर जप्त केला. दिनांक ३०/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे विष्णु रामकिसन तांबडे रा.चिंचवण ता.वडवणी जि.बीड यांनी फिर्याद दिली की,दि.२६/०५/२०२५ फिर्यादी यांचा पुतण्या याने फिर्यादीच्या शेतामध्ये दिवसभर ट्रॅक्टरने शेतनांगरट करुन रात्री ०७.०० वा सुमारास ट्रॅक्टर गोठयाजवळ उभा केला होता. दि.२७/०५/२०२५ रोजी सकाळी ०६.००वा. सुमारास फिर्यादी यांचा भाऊ याने फोनकरुन सांगीतले की, काल रात्री गोठयाजवळ नांगरासह उभा केलेला ट्रॅक्टर हा गोठयाजवळ दिसत नाही. फिर्यादी याने चिंचवण- धारुर-केज भागात ट्रॅक्टरचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. या वरुन सदरचा ट्रॅक्टर कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरी केला असल्याचे फिर्यादी यांची खात्री झाल्याने पोलीस ठाणे वडवणी येथे गुरनं १४७/२०२५ कलम ३०३(२) इछ्ड प्रमाणे ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा नोंद केला होता. पोलीस अधीक्षक बीड यांनी पान २ वर

## लग्नाचा बहाना करुन लुटणारी टोळी गजाआड

पुण्यभूमी प्रतिनिधी

### वडवणी पोलिसांची कारवाई



बीडः तरुण मुलांचे लग्न करून देऊ असे सांगून पैशाची लूट करणाऱ्या महिला व पुरुषांना वडवणी पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०३ जून २०२५ रोजी वडवणी पोलीस स्टेशन येथे मनीषा नरेंद्र ननावरे वय २५ वर्षे राहणार संगमनेर, ही तिची मैत्रीण वैभवी राम शेटे राहणार, संगमनेर,अहिल्यानगर हिला घेऊन आली व तिने पोलिसांना माझ्या मैत्रिणीला तिचे घरच्यांनी डांबून ठेवले होते व मी तिला सोडवले अशी हकीकत कथन केली, सुरुवातीला महिला अधिकारी या नात्याने वडवणी प्रभारी -झख वर्षा व्ह गाडे यांनी वैभवी व मनीषा हिची व्यवस्थित प्रेमाने चौकशी केली, तसेच सोडवणूक करणाऱ्या ड्रायव्हरला देखील बोलवून घेतले, परंतु या तिघांनाही बोलवून घेतल्यानंतर तींघांची स्वतंत्र चौकशी केली असता मनीषाचे दोन दिवसापूर्वी नुकतेच गणेश बंडू घाडगे व २८ वर्षे राहणार उपळी, वडवणी या तरुणाशी लग्न झालेले असून त्यांनी सध्या लग्नासाठी मुली मिळत नाही आजारासाठी पान २ वर

## मंगळसूत्र चोरणाऱ्या तीन आरोपीस बेड्या



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडः जरा टप फाटा भागात एका स्कुटी वरुन जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरणाऱ्या तिघा जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी जर बंद करून त्यांच्याकडून ८८ हजाराचा माल हस्तगत केला. दिनांक २५/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे सुमन सुरेश सारुक रा.नंदनवन कॉलनी नगर रोड बालेपीर बीड यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, फिर्यादी हया त्यांच्या पती सोबत स्कुटी शिकण्यासाठी च-हाटा फाटा ग्राऊड येथे गेल्या होत्या परत घरी जातांना फिर्यादी स्कुटीवर एकटया जात असतांना फिर्यादी याचे पाठीमागुन अनोळखी तीन इसम हे विनानंबरच्या स्कुटीवर बसुन फिर्यादी यांचे जवळ आले व फिर्यादी यांचे गळयातील मिनी गंठन व सोन्याच्या मण्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकाऊन च-हाटा फाटा बीड रोड कडे निघुन गेले. या मध्ये फिर्यादी यांचे सोन्याचे एकुण २२ ग्रॅम किंमती ८८,०००/- रुपयाचा मुद्देमाल जबरी चोरी करुन घेवुन गेले होते. यावरुन पोलीस स्टेशन शिवाजीनगर गुरंन २९४/२०२५ कलम ३०४,३(५) बी.एन.एस प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

मा.पोलीस अधीक्षक बीड यांनी उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस उप-निरीक्षक श्रीराम खटावकर यांनी अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण अभिलेखावरील गुन्हेगारांची माहिती काढत असतांना दिनांक ०४/०६/२०२५ रोजी गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हया हा १) प्रकाश अशोक सानप वय १९ वर्षे २) सिध्दांत अशोक जाधव वय २१ दोन्ही रा.रायमोह ३) (विधीसंघर्षग्रस्त बालक) रा.खरगवाडी यांनी मिळुन केला आहे. अशी पान २ वर

**विद्यार्थ्यांकडून पानसुपारी** | **विद्यार्थी, पालक त्रस्त**

## दाखल्यासाठी विद्यार्थ्यांची अडवणूक!

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:तालुक्यात दहावी, अकरावी आणि बारावी शाळेचे नुकतेच निकाल लागले आहेत. सर्वच निकाल लागल्याने पुढील शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांची शाळेचा दाखला काढण्यासाठी लगबग वाढली. मात्र, हाच दाखला काढण्यासाठी विद्यार्थ्यांना तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे पालकही त्रस्त झाले आहेत.

शाळा सोडल्याचा दाखला देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून 'शाळा मदत निधी' या गोंडस नावाखाली काही शाळेला ५०, १००, २००/- रुपयाची 'पानसुपारी' दिल्याशिवाय विद्यार्थ्यांना व पालकांना दाखला दिला जात नाही, असा आरोप पालकांसह विद्यार्थ्यांकडून होत आहे. मात्र, आष्टी तालुक्यातील अनेक शाळा व खाजगी शिक्षणसंस्था



'शासनाच्या नियमांना केराची टोपली दाखवत' 'हम करे सो कायदा' अशा पद्धतीने वागत आहेत. पालक आपल्या मुलाला चांगले शिक्षण मिळावे, यासाठी दिवस-रात्र पान २ वर

माध्यमिक शाळा संहिता कलम ३१ नुसार शाळा सोडल्याचा दाखला पूर्णतः निःशुल्क आहे. अशी कोणतीही शाळा किंवा शिक्षण संस्थेने हे आकारल्यास त्यांच्यावरती फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो, असे कायदातज्ञ सांगतात.

आष्टी तालुक्यात काही शाळा व शिक्षण संस्थांनी वरील रक्कम रोख स्वरूपात घेतली. व त्याची पावती संबंधित विद्यार्थी, पालकांना, दिलेली नाही. शाळा सोडल्याचा दाखला देण्यासाठी कोणतीही फी आकारू नये, अशी मागणी पालकवर्गातून होत आहे.

## जगजेतेपदाला गालबोट

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाने पंजाब किंग्ज संघाला पराभूत करून १८ वर्षांनंतर पहिल्यांदा आयपीएल चषकावर आपले नाव कोरले. या विजयानंतर बुधवारी बंगळुरूत आरसीबी संघाच्या विजयोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विजय रॅलीही काढण्यात येणार होती. संघ विमानतळावर दाखल झाला तेव्हा इतकी प्रचंड गर्दी झाली की ती पाहून नंतर काढण्यात येणा-या विजय रॅलीला परवानगी नाकारली. रस्त्यावर जमा होणा-या गर्दीमुळे संभाव्य रहदारी समस्या लक्षात घेऊन विजयी मिरवणुकीला परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे कर्नाटक क्रिकेट संघटनेने एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये आरसीबी संघाच्या सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. त्याआधी विधान सौधात संघाचा सत्कार करण्यात आला. त्यावेळीही विधान सौधाबाहेर प्रचंड गर्दी जमली होती. तिकडे स्टेडियमही तुडुंब भरले होते. स्टेडियमची प्रेक्षक क्षमता ३२ ते ३५ हजार आहे आणि बाहेर दोन लाख चाहते स्टेडियममध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत.

स्टेडियमचे बंद गेट उघडण्यासाठी लोकांची रेटारेटी सुरू, त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांचा लाठीमार मग लोकांची पळापळ सुरू, त्यात अनेकजण चिरडले गेले, काही जणांचे गुदमरून प्राण गेले. भीषण चेंगराचेंगरीत ११ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये सात पुरुष, तीन महिला आणि एका बालिकेचा समावेश आहे. चेंगराचेंगरीत ३३ जण जखमी झाले असून त्यातील ११ जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती आहे. दुस-या एका वृत्तानुसार ५० जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. विजयी संघाची खुल्या बसमधून मिरवणूक काढली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे बंगळुरूच्या रस्त्यावर हजारोंच्या संख्येने चाहते जमा झाले होते. सायंकाळी साडेचार वाजता राज्य सरकारतर्फे विधान सौध आवारात आरसीबीच्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास संघ स्टेडियममध्ये दाखल झाला. कार्यक्रम सुरू होण्याआधीच बाहेर चाहत्यांमध्ये धक्काबुक्की सुरू झाली. त्यामुळे चाहत्यांवर नियंत्रण ठेवणे पोलिसांच्या आवाक्याबाहेर गेले. त्यांनी लाठीमार करून जमावावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. यावेळी गेट क्र. १२ जवळ भीषण चेंगराचेंगरी झाल्याने अनेकजण पायदळी तुडवले गेल्याने गंभीर जखमी झाले.

काही जणांनी जागेवरच प्राण सोडले. जखमींना वैदेही, बौरिंग, लेडी कर्झन, विठ्ठल मल्ल्या आदी रुग्णालयांत दाखल करण्यात आले. ११ जणांवर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. चेंगराचेंगरीत १४ वर्षीय दिव्यांश या मुलीचा मृत्यू झाला. नववीत शिकणारी ही मुलगी आई-वडिलांसमवेत स्टेडियममध्ये आली होती. चेंगराचेंगरीत गुदमरून तिचा मृत्यू झाला. दुर्घटनेला ढिसाळ नियोजन कारणीभूत आहे हे उघड आहे. पोलिसांना गर्दीचे नियोजन करता आले नाही. याआधी मुंबईत अनेकवेळा विजयी भारतीय संघाचे स्वागत करण्यात आले. २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे भव्य स्वागत करण्यात आले. तेव्हा चाहत्यांचा महासागर लोटला होता. परंतु मुंबई पोलिसांनी केलेल्या कौतुकास्पद नियोजनामुळे कोणतीही अप्रिय घटना घडली नाही. बंगळुरूमध्ये खेळाडूंना पाहण्यासाठी अतिउत्साही चाहते बॅरिकेड्स, संरक्षक भिंत ओलांडून आत शिरत होते. काही जण झाडावर चढून बसले होते, अनेकजण खाली पडून जखमी झाले. चाहत्यांचा चेंगराचेंगरीत मृत्यू झाल्याने विजयोत्सवाच्या आनंदावर विरजण पडले आहे. हजारो चाहते विधान सौध आणि स्टेडियमबाहेर जमा होत होते. दुचाकी, चारचाकी, मेट्रो रेल्वे, बस आणि अन्य वाहनांद्वारे चाहते स्टेडियममध्ये येत होते.

अखेर गर्दीला नियंत्रित करण्यासाठी सायंकाळी साडेचार वाजता मेट्रो रेल्वे बंद करावी लागली. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मृतांप्रति संवेदना व्यक्त केली असून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तसेच जखमींवर मोफत उपचार केले जाणार आहेत. दुर्घटनेत आता राजकारण शिरले आहे. काँग्रेस सरकारच्या बेजबाबदारपणामुळे चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली, अनेकांना जीव गमवावे लागले. गर्दी नियंत्रणासाठी कोणतेही उपाय करण्यात आले नव्हते. निष्पाप लोकांचे बळी जात असताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार क्रिकेटपटूंसोबत रील शूट करण्यात व्यस्त होते अशी टीका राज्य भाजपने केली आहे. आरसीबीच्या विजयोत्सवावेळी घडलेल्या दुर्घटनेला जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आरसीबी व्यवस्थापनाने खुल्या बसमधून रोड शो करण्याचा निर्णय घेतला होता. पण रोड शो झाला नाही. सरकारने विधान सौध आवारात खेळाडूंचा सत्कार आयोजित केला होता. पावसामुळे १५ मिनिटांत हा कार्यक्रम पार पडला. परंतु स्टेडियममधील कार्यक्रम आम्ही आयोजित केला नव्हता असे सरकारचे म्हणणे आहे. सरळ सरळ हा जबाबदारी झटकण्याचा प्रकार आहे. चाहत्यांची गर्दी होणार हे स्पष्ट असताना सरकारने केलेली व्यवस्था तोकडी पडली हे उघड आहे. भारतातील क्रिकेटवेड सर्वज्ञात आहे. असे असले तरी चाहत्यांनी सुद्धा आपली सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवायला हवी होती.

# वृक्षतोड होते,तेव्हा...



५ जून हा जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो.मानवाने नैसर्गिक साधनसंपत्तीचा वारेमाप वापर करून, हवामान बदलण्यासाठी भाग पाडले आहे.त्यामुळे निसर्ग ऋतू अवेळी धिंगाणा घालत आहेत. आजच्या जागतिक हवामान दिनानिमित्त पर्यावरण संवर्धन करणे आवश्यक आहे किंबहुना काळाची गरज आहे. पर्यावरण संवर्धनासाठी वर्तमानपत्रात लेख छापून येतात, मोठं मोठी व्याख्यान ठेवली जातात. विशेषत: ग्रामीण आणि निमशहरी भागात व्याख्यानाला महानगरातील पर्यावरण अभ्यासक, तज्ञ मार्गदर्शनासाठी बोलावले जातात. जणूकाही पर्यावरणाच्या नासधूस करण्यात ग्रामीण भागातील लोक जबाबदार आहेत. वर्तमानपत्रातील लेख महानगरातील नागरिकांना वाचायला वेळ मिळतो का? मुळात धावपळीच्या , स्पर्धेच्या आणि धकाधकीच्या जीवनात अश्या विषयांकडे लक्ष द्यायला खरंच वेळ आहे का या शहरातील माणसांना आणि ज्यांना पाऊस आलेला आणि गेलेला याची जाणीव नसते. तसेच,उन्हाळा आहे की नाही आणि हिवाळ्यातही हीच परिस्थिती उपभोगत असलेल्या, ऐशोरामात जीवन जगणाऱ्या महाशयांनी वर्तमानपत्रांची पानं भरून आणि व्याख्यान देऊन पर्यावरण संवर्धन होईल का? दिवसेंदिवस उन्हाळा अधिक उष्ण होत चालला आहे. त्याला जबाबदार काँक्रीटचे पसरलेले जंगल आहे. झाडांची कत्तल करायची आणि त्या जागी आलिशान फ्लॅट बांधायचा स्वतः साठी किंवा व्यवसायासाठी आणि मग गच्चीवर किंवा कंपाऊंड वॉल च्या आत झाडं लावून, पर्यावरण संवर्धनाचा संदेश द्यायचा. यामुळे पर्यावरण संवर्धन होईल काय? केवळ ग्रामीण आणि निमशहरी भागात पर्यावरण संवर्धनाच्या गप्पा मारण्यापेक्षा, शहरातील लोकांनीं स्वतः ला बदलायला हवं.झाडांची कत्तल करून आणि तिथे आलिशान बंगला बांधून व रिकाम्या जागेत फुलं फुलवून दिखाऊपणा सोडला पाहिजे.

पर्यावरणाच खरं संवर्धन आणि संरक्षण हिच गाव खेड्यातील माणसं करताहेत. गाव खेड्यातील माणसं शहरांत कधी गेलीच तर हातात कापडाची पिशवी घेऊन जातात. पण, याऊलट शहरातील लोक प्लॅंस्टीक पिशवीचा किंवा कॅंरीबॅंगचा वापर करतात. यातूनही बरंच काही शिकण्यासारखं आहे.त्यामुळे खरी गरज आहे ती शहरातील लोकांना पर्यावरणाची ओळख करून देण्याची .कोणत्याही ऋतूत मानवाने ऋतुप्रमाणे वागले पाहिजे.ग्रामीण किंवा निमशहरी भागातील लोक ऋतुनुसार राहतात. ते हिवाळ्यात गरम हवा देणारी आणि उन्हाळ्यात थंड हवा देणारी तसेच पावसाळ्यात उष्ण हवा देणारी यंत्र वापरत नाहीत.त्यामुळे निसर्गाच्या बदलानुसार माणसाने वागणे आवश्यक आहे. प्लॅंस्टिकचा सर्वाधिक वापर शहरातील कुटुंबात दिसून येईल. याउलट काही ग्रामीण भागात अजूनही मातीची भांडी वापरली जातात. शेतातील झाडं तोडणारे शेतकरी, झाडं लावून, त्यांची काळजीही तेच घेतात.त्यामुळे शेतकऱ्यांना, किंवा खेड्यातील लोकांना वृक्षसंवर्धन किंवा पर्यावरण संवर्धन करण्याच्या गोष्टी करणं म्हणजे फार काही पर्यावरणवादी आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न करणं होय. उद्योग उभारणारी मंडळी काही खेड्यातील नसतात. ते कारखाना उभारणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करतात.मला वाटत त्यांना प्रथम पर्यावरण शिक्षण द्यायला हवं.दरवर्षी पर्यावरण दिनानिमित्त सरकारदरबारी अमुक - अमुक कोटी वृक्षलागवड करण्याचा निर्णय घेतला जातो. पण, तेच सरकार एखाद्या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करतो. तेव्हा पर्यावरण संवर्धन कुठं असतं? हा प्रश्न कोणी आणि कोणाला विचारावा. झाडं वाचली तर पर्यावरण वाचेल! पर्यावरण संवर्धन हे सध्याच्या आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आवश्यक आहे. जंगले, वन्यजीव, पाणी आणि ऊर्जा यासारख्या नैसर्गिक संसाधनांचे जतन करणं हे खरं पर्यावरण संवर्धन आहे. पर्यावरण संवर्धनामध्ये परिसंस्था आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण, जतन आणि पुनर्संचयित करणे



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

समाविष्ट आहे. जैवविविधता राखण्यासाठी, हवामान बदल कमी करण्यासाठी आणि मानव आणि ग्रह दोघांचेही दीर्घकालीन कल्याण सुनिश्चित करण्यासाठी हे आवश्यक आहे.

पृथ्वीवरील तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. याला अमेरिकेची संयुक्त संस्थाने, युरोप, चीन, जपान हे देश जागतिक तापमानवाढीस जास्त जबाबदार आहेत, कारण ते जीवाश्म इंधनांचा मोठ्या प्रमाणात वापर करतात आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन करतात. आपण देखील यास जबाबदार आहोत. जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी, मानवी क्रियाकलाप कमी करणे आणि पर्यावरणास अनुकूल उपाय करणे आवश्यक आहे.कार्बन डायऑक्साइड, मिथेन, नायट्रस ऑक्साईड आणि इतर हरितगृह वायूंचे उत्सर्जन यामुळे वातावरणातील उष्णता अडकते, त्यामुळे मुळे पृथ्वीचे तापमान वाढते. त्यामुळे पर्यावरणासाठी वृक्षतोड हानिकारक आहे.भारतामध्ये उद्योगासाठी वृक्षतोड प्राचीन काळापासून सुरू झाली आहे. विशेषतः ब्रिटिश राजवटीत, लाकूड आणि इतर वन उत्पादनांची मोठ्या प्रमाणावर मागणी होती, ज्यामुळे जंगलतोड वाढली.१९ व्या शतकात, भारतीय वन अधिनियम १८६५ मध्ये, लाकूड उद्योगासाठी काही प्रमाणात नियमन करण्यात आले, परंतु या नियमांमुळेही जंगलतोड कमी झाली नाही.२० व्या शतकात, उद्योग आणि विकासाच्या वेळेनुसार वृक्षतोड अधिक वाढली.उद्योगासाठी वृक्षतोड करण्यासाठी, भारतीय वन कायदा, १९२७, वन (संवर्धन) कायदा, १९८० आणि वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ यांसारख्या कायद्यांचे पालन करणे आवश्यक आहे. पण,याला सरकारकडून किती अंमलबजावणी होते हे या कायद्याचं यश आणि पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक पाऊल ठरेल. उद्योगासाठी वृक्षतोड करण्यासाठी, कायद्यांचे पालन करून आणि आवश्यक परवानग्या घेऊन वृक्षतोड केली जाईल.याचे भान ठेवणे आवश्यक आहे. वृक्षतोडीमुळे हवामान बदल, मातीची धूप, जैवविविधता कमी होणे आणि इतर अनेक समस्या उद्भवतात. वृक्षतोड थांबवून पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. खेड्यातील आणि निमशहरातील जनतेला झाडांचं महत्त्व सांगण्याची गरज नाही.त्यामुळे लोकजागृती करण्यापूर्वी सरकार आणि उद्योगपतींमध्ये जागृती गरजेची आहे.त्यामुळे जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी मदत होईल. पर्यावरण संवर्धनासाठी व्याख्यान घ्यायचीच असतील तर ती महानगरात घ्यावीत, घेतली जात नाहीत, असे नव्हे! तर सरकारनेही या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन प्रकल्पाला मंजुरी द्यावी. शासकीय प्रकल्पासाठी किंवा उद्योजकांना,उद्योग उभारण्यासाठी विचार करूनच परवानगी देणे आवश्यक आहे. तरच,पर्यावरणाचा समतोल राखला जाईल.

## पान एक वरून

पान एक वरून

**प्लास्टिक टाळून कापडी पिशव्या**

राहायला हवे. पेपर व प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. प्लास्टिकच्या पिशवी ऐवजी कापडी पिशवी वापरात आणावी. प्लास्टिकला नो व पर्यावरणाला हो म्हणून आज पासून पर्यावरण संवर्धनाची शपथ घेण्याचे आवाहन मंत्री श्रीमती मुंडे यांनी केले. मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या की, मंत्रालयात राबविण्यात आलेला पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम फक्त उपक्रम नसून हा एक जनसंदेश आहे. आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जागरूकता आपण या उपक्रमामार्फत निर्माण करणार आहोत. पर्यावरणाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपल्या कुटुंबीय, सहकार्य व मित्र-मैत्रिणीना पर्यावरण जोपासण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात याची माहिती द्यायला हवी. कागदाच्या व प्लास्टिकच्या वापरास आळा घालून आपण या उपक्रमाची सुरुवात करूया. मंत्रालयात साडेनऊ हजार कर्मचारी कार्यरत असून या सर्वांनी एकल वापर प्लास्टिक मुक्तीचा हा संदेश संपूर्ण महाराष्ट्रात नेवू. माझे कार्यालय माझे घर प्लास्टिक मुक्त, पर्यावरण स्नेही ही फक्त घोषणा नसून त्याच्या अंमलबजावणीसाठी ठोस पाऊले उचलूयात. प्लास्टिक मुक्त मंत्रालय हा संकल्प मनात ठेवून सर्वांनी कागदाचा वापर टाळू व कागद विरहित प्रणाली वापरात आणू असेही त्या म्हणाल्या.

**लग्नाचा बहाना करून लुटणारी**

मनीष्याच्या मावशीला व तिच्या काकाला त्यांनी तीन लाख रुपये नगदी दिले असे कळाले, तसेच मनीषा कडे वेगवेगळे आधार कार्ड असून तिचे काका व मावशी हे देखील नकली असल्याचे समजले, लग्नासाठी मुली मिळत नसल्याने अनेक गरीब सर्वसाधारण,तसेच प्रतिष्ठित कुटुंबांना अशांचा शोध घ्यायचा, लग्न होत नसल्या तरुणांना सुंदर मुलगी दाखवणे,नंतर तिच्या आईला कॅन्सर झाला आहे, किंवा तिला आई-वडीलच नाहीत किंवा इतर आर्थिक अडचण सांगून पैसे उकळणे, व पुन्हा पैसे घेवुन पळून जाणे किंवा पळून जायला जमले नसल्यास त्याच कुटुंबा विरुद्ध पोलीस स्टेशन येथे जाऊन तक्रार दाखल करणे, आणि अशावेळी त्या कुटुंबाने फसवणुकीच्या तक्रारीबाबत माघार घेणे, मी पुन्हा नवीन ग्राहक शोधंणे, अशी या टोळीची गुन्हे करण्याची पद्धत आहे. रणजीत अहिरे या आरोपीच्या चक-१७-ए २८८९ मारुती सुझुकी या गाडीचा मुलगी दाखवण्यासाठी तसेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी वापर करत असे, यामध्ये आतापर्यंत वडवणी पोलिसांनी १)वैभवी शेटे( नवरी), २) मनीषा ननावरे (नवरीची मैत्रीन) ३) रणजीत अहिरे( ड्रायव्हर) तिघेही राहणार संगमनेर अहिल्यानगर व ४)यमुनाबाई शिंदे,( मध्यस्थी) यांना अटक केली असून यात एकाच नावाचे विविध आधार कार्ड, व एक चार चाकी असा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त आहे.तरी अशा प्रकारचे प्रकरणे आल्यास त्याला बळी लग्न जुळवण्यासाठी कोणत्याही प्रकारे पैसे देऊ नये असे आव्हान बीड पोलिसांनी नागरिकांना केले आहे. ही कारवाई अधीक्षक नवनीत कावत व अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणीच्या प्रभारी अधिकारी -ळि वर्षा व्हगाडे, ीळि संजय राठोड, ीळि राजू राठोड, पुरुष अंमलदार विलास खरात, अविनाश गवळी व महिला पोलीस सुवर्णा खोसे यांनी केली.

**मोठीवाडीची महिला सरपंच**

येत आहे. म्हणून सासू व सुनाचे सरपंच पद आणि सदस्य पद अपात्र ठरवण्यात आले होते. जिल्हाधिकारी बीड यांचा आदेश क्रमांक २२/२०२३ हा कायम करण्यात आला. सदरील प्रकरणांमध्ये प्रतिवादी अक्षय राजेभाऊ सरवदे यांच्याकडून अँड. पी.आर.खेत्री यांनी बाजू मांडली. तर अपिलार्थी यांच्यावतीने अँड. सुदर्शन साळुंखे तर्फे अँड. महेंद्र गडळे यांनी बाजू मांडली होती.

**ट्रॅक्टर चोरी करणाऱ्या टोळीतील**

उघडकीस न आलेल्या गुन्हयाचा आढावा घेवुन उघडकीस न आलेले वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस उप-निरीक्षक महेश विघ्ने यांनी अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचे विश्लेषण अभिलेखावरील गुन्हेगारांची माहिती काढत असतांना दिनांक ०३/०६/२०२५ रोजी गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हया हा १) दिपक महादेव चाटे वय १९ वर्षे रा.तांबवा ता.केज.जि.बीड २) अमोल सुधाकर घायतीडक वय २१ दोन्ही रा.चिंचवण ता.वडवणी जि.बीड ३) समाधान कोंडीराम मुंढे वय २० ४) सचीन सतीष मुंढे वय - १९ वर्षे दोन्ही रा. चोंडी ता. धारुर जि.बीड यांनी मिळुन चोरला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही लागलीच टिम सह सदर आरोपीतांचे शोध कामी तांबवा येथे जावुन यातील आरोपी नामे दिपक महादेव चाटे याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्यास गुन्हया बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली देवुन सदर गुन्हा उघडकिस आणला आहे. त्याचे ताब्यातुन चोरी केलेला ट्रॅक्टर नांगरासह कि.४,३५,०००/- किंमतीचा जप्त करुन ताब्यात घेवुन पोलीस ठाणे वडवणी यांचे ताब्यात दिला आहे.सदर आरोपीस दिनांक ०५ /०६/२०२५ पर्यंतची पोलीस कोठडी सुणावण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण चार आरोपी आरोपी निष्पन्न झालेले असुन त्यापैकी एका आरोपींस स्था.गु.शा. पथकाने पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे. वडवणी यांचे ताब्यात दिलेले असुन गुन्हयातील उर्रवरीत आरोपीचा शोध पो.स्टे.वडवणी व स्थागुशा बीड करीत आहे. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत , अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने, पोह/महेश जोगदंड, पोह/राजु पठाण, पोअं/बप्पासाहेब घोडके, पोअं/अश्विनकुमार सुरवसे नेम.स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

**मंगळसूत्र चोरणाऱ्या**

खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही लागलीच टिम सह सदर आरोपीतांचे शोध कामी रायमोह येथे जावुन आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन गुन्हया बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली देवुन सदर चा उघडकिस आणला आहे.सदर गुन्हयात एकुण तीन आरोपी आरोपी निष्पन्न झालेले असुन त्यापैकी एक (विधीसंघर्षग्रस्त बालक) आरोपींना स्था.गु.शा. पथकाने पुढील कार्यवाहीसाठी पो.स्टे. शिवाजीनगर यांचे ताब्यात दिलेले असुन गुन्हयातील गेलेमाल शोध पो.स्टे.शिवाजीनगर व स्थागुशा बीड करीत आहे. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत , अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/ अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, पोना/ बाळु सानप, पोकॉ/अर्जुन यादव, अश्विनकुमार सुरवसे, चालक/सिध्देश्वर मांजरे, नेम. स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

**दाखल्यासाठी विद्यार्थ्यांची**

एक करून पै-पै जमवत आपल्या संसाराचा गाडा हाकतात.अशातच दहावी, अकरावी आणि बारावी ऑनलाइन फीदेखील भरावी लागते. तसेच विद्यार्थी पास झाल्यानंतर त्या विद्यार्थ्यांकडून शाळा व काही शिक्षण संस्था प्रति दाखला ५०, १००, २००/- रुपये घेत असल्याचे पालकांकडून सांगण्यात येत असून, याबाबत काही पालकांनी शिक्षणमंत्र्याकडे तक्रार केली आहे.

## पान सहा वरून

पान सहा वरून

**अपघात स्थळ काढण्याची**

महामार्ग बंद करून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल करिता निवेदन सादर.यावर तात्काळ कारवाई करू असा शब्द मा जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक साहेबांनी राष्ट्रीय महामार्ग समिती गेवराई चे अध्यक्ष व भाजप नेते संजय भाऊ काळे व समितीला दिले असल्याचे समजते.या बैठकीस संजयभाऊ काळे यांच्या सह समिती चे सदस्य श्यामराव गायकवाड, ॲड राहूल राका, विलास खिसाडे व पत्रकार बांधव उपस्थित होते.

**महाआवास योजनेत पाथर्डी**

मंजूर झाले असल्याचे गटविकास अधिकारी कांबळे यांनी सांगितले. पाथर्डी पंचायत समितीला ग्रामीण विभागातील पुरस्कार मिळाल्याने जिल्हाभरातून आनंद व्यक्त होत आहे उत्कृष्ट नियोजन करण्यात अधिकारी व कर्मचारी यशस्वी झाल्याने कौतुक होत आहे

**राष्ट्रवादीचा पुणे येथे**

उपस्थितीत वर्धापन दिन कार्यक्रम होणार असून यावेळी माननीय शरदचंद्र पवार साहेब यांची मार्गदर्शन लाभणार आहे. जिल्ह्यातील सर्व निमंत्रित पदाधिकाऱ्यांनी या वर्धापन कार्यक्रमास पुणे येथे वेळेवर उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

**बीड जिल्हा सहकार बोर्डाच्या**

श्री बांगर सध्या राज्य सहकारी संघावरही संचालक म्हणून काम पाहत आहेत. नवनिर्वाचित पदाधिकारी व संचालक मंडळाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**खेड्यात अवैध दारू विक्री**

आहे तरी दारु बंदी विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ केज तालुक्यातील अवैध दारू विक्री करणाऱ्या धाब्यावर, दुकानावर तातडीने कारवाई केली पाहिजे व केज दारु बंदी विभागाचे अधिकारी यांना समज दिली पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**ड्रीम वर्क्स रिअल्टर्सकडून**

संचालक श्री. नरेंद्र बालवडकर यांनी सांगितले, आमची दृष्टी केवळ भौतिक विकासापुरती मर्यादित नाही, तर पर्यावरणीय समतोल राखण्याचीही आमची तितकीच बांधिलकी आहे. हा उपक्रम म्हणजे पर्यावरण रक्षणासाठी ड्रीम वर्क्स रिअल्टर्सने घेतलेली सजग आणि दीर्घकालीन जबाबदारी आहे. या उपक्रमात कंपनीचे कर्मचारी, पर्यावरणप्रेमी नागरिक आणि स्थानिक रहिवासी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. ड्रीम वर्क्स रिअल्टर्सने याच्या माध्यमातून रिअल इस्टेट क्षेत्राने शाश्वत शहरी विकासात पुढाकार घेण्याचा एक सकारात्मक संदेश दिला आहे.

**वृक्षसंवर्धन प्रत्येकाचे कर्तव्य**

न्यायाधीश राजश्री परदेशी यांनी स्वच्छता कर्मचा-याच्या हस्ते वृक्षारोपन करुन वृक्षांचे संवर्धन करण्यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विविध वृक्षांचे महत्त्व सांगून वृक्षापासून मानवास मिळणारे विविध घटकांची माहिती सांगितली. त्याचबरोबर त्यांनी आज वृक्षांची संख्या कमी झाल्यामुळे पर्यावरणाचा -हास होत आहे त्यामुळे भविष्यात पुढील पिढीला आनंदी व आरोग्यदायी ठेवण्यासाठी प्रत्येकाने एक वृक्षाचे रोप लावून त्याचे संगोपन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. निसर्गाने मानवी जीवनाला नेहमीच भरभरुन दिलेले आहे त्यामुळे आपणही निसर्गाची काळजी घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. वृक्षारोपन कार्यक्रमास हजर असणारे मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर एस.एस. बुद्रूक यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

**आवास योजनेसाठी नवीन**

पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## वेचक

### १० जून रोजी कोकण विभागीय पेन्शन अदालत

**नवी मुंबई :** कोकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. १० जून २०२५ रोजी दुपारी १२.०० वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोकण भवन येथे आयोजित केली आहे. या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे कोकण विभाग प्र. तहसिलदार,(सामान्य प्रशासन) नरेश जगताप यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### दैवज्ञ समाजाचा सामुदायिक मौजीबंधन कार्यक्रम

**भाईंदर :** अखिल भारतीय दैवज्ञ समाजोन्नती परिषदेतर्फे आयोजित आणि डॉ. गजानन रत्नपारखी यांच्या गुरुकृपा हार्ट फाऊंडेशनच्या



सौजन्याने विनामूल्य सामुदायिक मौजीबंधन कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला. महाराष्ट्र हायस्कूलच्या सिद्धीविनायक सभागृहात आयोजित सदर विनामूल्य सामुदायिक मौजीबंधन कार्यक्रमात २१ बटूंचे मौजीबंधन झाले. बटूंना गुरुकृपा हार्ट फाऊंडेशनच्या वतीने छत्रीचे वाटप करण्यात आले. तसेच उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते जयेश बंदरकर यांनी बटूंना स्टील बनावटीचे जेवणाचे डबे भेट दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यात डॉ. गजानन रत्नपारखी, चंद्रशेखर दाभोळकर, दिलीप मालंडकर, सुनील देवरुखकर यांच्यासह सर्व कार्यकारी मंडळाचे सहकार्य मिळाले होते.

### गरजू रुग्णांना मोफत फळे वाटप

**कल्याण :** सालाबादप्रमाणे या ही वर्षी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय नेते सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त सेंट्रल



हॉस्पिटल, उल्हासनगर येथे बाल रुग्ण कक्ष, महिला प्रसूती कक्ष, पुरुष अतिदक्षता कक्ष येथे शेकडो गरजू रुग्णांना मोफत फळे वाटण्यात आली. या वेळेस शल्यचिकित्सक तथा मुख्य वैद्यकीय अधिकारी मनोहर बनसोडे यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उल्हासनगर शहर अध्यक्ष दीपक अहिरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळेस बोलताना रिपब्लिकन सेनेचे कल्याण-डोंबिवली जिल्हाध्यक्ष तथा ठाणे जिल्हा निमंत्रक आनंद नवसागरे यांनी सांगितले की, दरवर्षी रिपब्लिकन सेनेतर्फे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त कल्याण-डोंबिवली शाखेतर्फे जनहितार्थ झाडे लावा, झाडे जगवा. गरजू रुग्णांना मोफत फळे वाटप, मेडिकल कॅम्प असे वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. या ही वर्षी हा उपक्रम त्याचाच एक भाग आहे. आम्ही रुग्णांना फळे वाटल्यानंतर रुग्णांच्या नातेवाइकांशी रुग्णांबद्दल विचारपूस करून त्यांना असलेल्या समस्या जाणून घेण्यात आल्या. या वेळेस प्रमुख उपस्थिती म्हणून रिपब्लिकन सेना ठाणे महिला अध्यक्ष अलका जगताप, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण मिरके, कल्याण शहर अध्यक्ष दामू काऊतकर, कल्याण-डोंबिवली जिल्हा संघटक युवराज वाटूरे, कल्याण महिला अध्यक्ष रेखा गोडबोले, उल्हासनगर शहर संघटक दीपक पाटकर आदी उपस्थित होते.

### नागरी संरक्षण मूलभूत प्रशिक्षण शिबीर उत्साहात



**कल्याण :** देशातील युद्धजन्य परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्तींची पार्श्वभूमी बघता या संकटाना तोंड देण्यासाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नागरी संरक्षण (सिव्हिल डिफेन्स) संघटनेत स्वयंसेवकांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न वेगाने सुरू आहेत. त्यासाठी नागरी संरक्षण दल, नवी मुंबई समुह ठाणे जिल्हा अंतर्गत कल्याण पश्चिम येथे नागरी संरक्षण मूलभूत प्रशिक्षण शिबिर यशस्वीपणे पार पडले. या मोहिमेचा भाग म्हणून, डॉ. प्रकाश ठमके (मानसेवी निदेशक, नागरी संरक्षण) यांच्या पुढाकाराने नागरी संरक्षण मूलभूत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रशिक्षण किसान सहकारी गृहनिर्माण संस्था, केडीएमसी गार्डनजवळ, कल्याण (प.) येथे घेण्यात आले. शिबिरात विविध वयोगटांतील २३ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेऊन यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केले. या शिबिरात प्रशिक्षणार्थींना नागरी संरक्षण दलाची कार्यपद्धती, समाजातील नागरी संरक्षण संघटनेची भूमिका, आपत्ती प्रकार व त्यांचे व्यवस्थापन, प्रथमोपचार, बचाव कार्य, नियंत्रण व संप्रेषण, अग्निशमन अशा विविध विषयांवर तज्ञ मार्गदर्शकांनी सैद्धांतिक व प्रात्यक्षिक स्वरूपात सखोल माहिती दिली. सर्व प्रशिक्षणार्थींनी या शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले असून, राष्ट्रसेवेची ही अनोखी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. शिबिराच्या अंतिम दिवशी लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आली. यानंतर ना. सं. नवी मुंबई समूह, ठाणे येथील उपनियंत्रक विजय जाधव यांनी उपस्थितांना नागरी संरक्षणाची शपथ दिली व त्याचे महत्त्व विशद केले.

# केडीएमसीच्या अ प्रभागातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई

## भरपावसात बेकायदा चाळी जमीनदोस्त

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**



कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अ प्रभागाचे सहा.आयुक्त प्रमोद पाटील यांनी नांदप रोड टिटवाळा येथे सुरू असलेले अनधिकृत बांधकाम मंगळवारी सकाळी जमीनदोस्त केले.आता पाऊस सुरू झाला आहे. पालिका अधिकाऱ्यांचे आपल्याकडे लक्ष नाही, असा विचार करून भूमाफियांनी टिटवाळा, गाळेगाव, नांदप भागात बेकायदा चाळी उभारण्याचे काम हाती घेतले होते. याविषयीची माहिती मिळताच अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी जेसीबी आणि तोडकाम पथकाच्या साहाय्याने या बेकायदा चाळी, व्यापारी गाळे जमीनदोस्त केले.

मागील पाच महिन्यांपासून टिटवाळा, मांडा परिसरातील अ प्रभाग हद्दीत बेकायदा बांधकामांच्या विरुध्द जोरदार तोडकाम मोहीम सुरू आहे. प्रभागात एकही नवीन बेकायदा बांधकाम उभे राहणार नाही याची काळजी अ प्रभागाकडून घेतली जात आहे. पाऊस सुरू झाला असल्यामुळे पालिका कर्मचाऱ्यांचे आपल्याकडे लक्ष नाही. आपण घाईने बांधकाम पूर्ण करून टाकू, असा विचार करून भूमाफियांनी नांदप रस्ता टिटवाळा येथे बेकायदा चाळी उभारण्याचे काम सुरू केले होते. अशाच पद्धतीने गाळेगावमधील शांताबाई नगर भागात अ प्रभागातील अतिक्रमण नियंत्रण विभागाला अंधारात ठेऊन ही बेकायदा बांधकामे केली जात होती. या बांधकामांना पालिकेच्या कोणत्याही प्रकारच्या परवानग्या घेण्यात आल्या नव्हत्या.

या बेकायदा बांधकामांच्या तक्रारी अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्याकडे प्राप्त होताच, त्यांनी या बांधकामांची खात्री करण्यासाठी अतिक्रमण नियंत्रण विभागातील कर्मचारी पाठविले. ही बेकायदा बांधकामे घाईघाईने पूर्ण केली जात आहेत, अशी माहिती कर्मचाऱ्यांकडून मिळाल्यानंतर मंगळवारी सकाळी जेसीबी, तोडकाम पथक घेऊन साहाय्यक आयुक्त पाटील टिटवाळा नांदप रस्ता येथे दाखल झाले. त्यांनी निर्माणाधिन बेकायदा बांधकामे जेसीबी आणि तोडकाम पथकाच्या माध्यमातून जमीनदोस्त केली. ही बांधकामे तोडल्यानंतर तोडकाम पथकाने गाळेगाव शांताबाई नगर येथे जाऊन तेथे उभारण्यात येत असलेले बेकायदा खोल्या आणि व्यापारी गाळ्यांचे बांधकाम जमीनदोस्त केले.

या कारवाईच्यावेळी अ प्रभागातील अधीक्षक, वरिष्ठ लिपिक, तोडकाम ठेकेदाराचे १० कामगार उपस्थित होते. एकीकडे पाऊस सुरू असताना दुसरीकडे तोडकाम पथकाने पावसाची पर्वा न करता ही बेकायदा बांधकामे तोडून टाकली. पाऊस सुरू असला तरी निर्माणाधिन बेकायदा बांधकामे तोडण्याची कार्यवाही सुरूच राहणार आहे. पाऊस सुरू झाला म्हणून पालिका आता बेकायदा बांधकामांवर कारवाई करणार नाही या भ्रमात भूमाफिया, नागरिकांनी राहू नये, असे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी सांगितले. गेल्या पाच महिन्यांपासून टिटवाळ्यात बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्याची मोहीम सुरू आहे.

### आमदार मंदा म्हात्रे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

# ‘होल्डिंग पाँडचे काम लवकरात लवकर करा’



◆ **नवी मुंबई (वार्ताहर) :**

नवी मुंबईमधील बेलापूर विभागातील सेक्टर १२ येथे असलेले सिडको निर्मित पावसाळी जलउदंचन केंद्र (पंप हाऊस) हे गेले ३५ ते ४० वर्षे जुने असून त्याचे भूमिपूजन होऊन देखील वर्ष झाले तरी काम पूर्ण न झाल्याने अवकाळी पावसामुळे नवी मुंबईत व विषेशतः सीबीडी बेलापूर विभागात सेक्टर ४,५,११ येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. तसेच काल सुद्धा अवकाळी पावसाने पुन्हा व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्याच अनुषंगाने बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आ. म्हात्रे यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील व सीबीडी येथील व्यापारी तसेच महापालिका शहर अभियंता शिरीष आरदवाड व इतर संबधित अधिकाऱ्यांसमवेत बेलापूर येथील होल्डींग पाँडचा पाहणी दौरा केला. पाहणी दौऱ्यासंदर्भात आ. म्हात्रे यांनी सदर होल्डींग पाँडचे काम लवकरात लवकर केले नाही तर संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, असे आदेश उपस्थित महापालिका अधिकाऱ्यांना दिले. त्याचबरोबर अवकाळी पावसाने जी परीस्थिती महाराष्ट्रभर उद्भवली तशी नवी मुंबईत येवू नये याकरिता प्रथम खबरदारी घ्यावी असे आदेश पालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.त्या पुढे म्हणाल्या की, गेल्या आठवड्यात अवकाळी पाऊस झाल्याने संपूर्ण महाराष्ट्र पाण्याखाली गेले होते. परंतु काही समाजकंटकांनी बेलापूर विभाग पाण्याखाली गेला असल्याची बातमी प्रसारित केली. त्याचबरोबर होल्डींग पाँडचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. परंतु होल्डींग पाँडच्या परिसरात जे अतिक्रमण केले गेले आहे. त्या अतिक्रमणावर येत्या ४ दिवसात कारवाई करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## परिवहन मंत्री, आयुक्तांनी केली नाले सफाईची पाहणी



◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर शहरातील नाले साफसफाईच्या कामाची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी पाहणी केली. यावेळी मिठागराच्या मोकळ्या जागेवर बेकायदेशीररित्या राडा-रोड आणि डेब्रिज टाकून भराव होत असल्याचे निदर्शनास आल्याने त्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याचे निर्देश प्रताप सरनाईक यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी शहरातील नाले सफाईच्या कामाची पाहणी केली त्यावेळी शहराच्या पश्चिमेकडे असलेल्या डी.बी रियालिटीच्या सुमारे ५०० एकर जागेवर राज्य व केंद्र शासनाच्या मिठागराच्या मोकळ्या जागावर आतापर्यंत सुमारे ५० हजार ट्रक राडा-रोड टाकण्यात आल्याचे आढळून आले.

सदर जागा समुद्रसपाटीपेक्षा उंचावर असल्यामुळे तेथे टाकलेल्या डेब्रिज व राडा-रोड मुळे तिथे पाणी मुरण्याचे व नैसर्गिकरित्या वाहून जाण्याचे प्रमाण कमी झाले, परिणामी पावसाचे पाणी शहरामध्ये ठिकठिकाणी साचले. भराव टाकताना संबंधितांनी महसूल विभागाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे असा भराव करण्यास प्रतिबंध करावा व टाकलेले डेब्रिज हलविण्यात यावे असे निर्देश महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांना मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

## स्पर्धांतून वीज सुरक्षेबाबत जनजागृती

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**




महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त ‘शून्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र’ ही संकल्पना घेऊन राज्यभरात वीज सुरक्षा सप्ताह साजरा होत आहे. सप्ताहाच्या तिसऱ्या व चौथ्या दिवशी मंगळवार व बुधवारी (४ जून) कल्याण परिमंडलात विविध ठिकाणी निबंध व चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून वीज सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली. मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली कल्याण परिमंडलात सुरक्षा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा होत असून अधिकारी-कर्मचाऱ्यांमार्फत विविध माध्यमातून वीज सुरक्षेचा जागर करण्यात येत आहे. विविध ठिकाणी तसेच शाळांमध्ये चित्रकला व निबंध स्पर्धांच्या माध्यमातून वीज सुरक्षेचा जागर करण्यात आला. तर उंबर्डे येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना तर तेजश्री इमारतीतील प्रशिक्षण केंद्रात कर्मचारी व पाल्यांना वीज सुरक्षेचे धडे देण्यात आले. आज वसुंधरा दिनानिमित्त परिमंडलातील सर्वच दहा विभाग कार्यालय स्तरावर वीज सुरक्षा व बचत विषयी रॅली काढण्यात येणार आहे. तर ६ जून रोजी सकाळी परिमंडलातील सर्व शाखा कार्यालयातील जनमित्र वीज सुरक्षेबाबत प्रतिज्ञा घेणार आहेत. याच दिवशी महावितरणचा २०वा वर्धापन दिन सर्व कार्यालयांमध्ये उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

## योग्य उपचारामुळे उल्लेखनीय पुनर्प्राप्ती

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

डॉ. सुरेखा जाधव, या स्वतः डॉक्टर असून, त्या आणि त्यांचे पती मिळून कल्याण येथे एक वृद्धांची देखभाल केंद्र चालवतात. मात्र गेल्या काही महिन्यांपासून तीव्र गुडघेदुखीमुळे डॉ. जाधव यांना चालणे, दैनंदिन कामे करणे आणि त्यांच्या केंद्राचे व्यवस्थापन करणेही कठीण झाले होते. यानंतर किम्स हॉस्पिटल्स, ठाणे येथे त्यांच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. विशेष म्हणजे या शस्त्रक्रियेनंतर केवळ २४ तासांत डॉ. जाधव यांना वेदनांशिवाय चालणे आणि पायऱ्या चढणे शक्य झाले. डॉ. स्वप्नील झांबरे, ऑर्थोपेडिक व जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन, किम्स हॉस्पिटल्स, ठाणे यांच्याकडे गेल्यानंतर डॉ. जाधव यांची सविस्तर वैद्यकीय तपासणी करण्यात आली. स्कॅनिंगमध्ये गुडघ्यात द्रव साचल्याचे आणि सांध्यात संरचनात्मक नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले. डॉ. झांबरे यांनी प्रथम साचलेला द्रव काढून तात्काळ आराम मिळवून दिला आणि नंतर शस्त्रक्रियेच्या माध्यमातून मूळ समस्या सोडवण्याची योजना आखली. शस्त्रक्रियेनंतर केवळ एका दिवसात, डॉ. जाधव पुन्हा स्वतःच्या पायांवर उभ्या राहिल्या, चालू लागल्या आणि पायऱ्या चढू लागल्या – ही एक उल्लेखनीय पुनर्प्राप्ती आहे.



**बिन छपराचा ज्येष्ठ नागरिक कट्टा :** मुंब्र्यातील पारसिक रेतीबंदर चौक येथे बिन छपराचा बस स्टॉप वजा ज्येष्ठ नागरिक कट्टा असून सध्या पावसाळा सुरू असल्याने प्रवाशांसह ज्येष्ठांनाही पावसात भिजत राहावं लागणार की काय असा सवाल प्रवासी व ज्येष्ठांकडून विचारला जात आहे. (छाया : अशोक घाग)

## मीरा-भाईंदर महानगरपालिका अधिकाऱ्यांना पदोन्नती





◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत प्रशासनाच्या कार्यक्षमता वृद्धीसाठी त्यांना आयुक्तांकडून महत्त्वपूर्ण पदोन्नती देण्यात आली आहे.

अग्निशमन अधिकारी प्रकाश बोराडे यांची उप-मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे. सहाय्यक अग्निशमन अधिकारी अल्पेश संखे, सदानंद पाटील, डॉसन ढोल्या व प्रशांत गुरव यांना अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

तर लेखाविभागात कार्यरत असलेले लेखाधिकारी उत्तम तारमाळे यांची उप- मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून पदोन्नती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विद्युत विभागात कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत असलेले प्रशांत जानकर यांना शाखा अभियंता (विद्युत) या पदावर पदोन्नती मिळाली आहे. या पदोन्नतीमुळे त्या त्या विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास नक्कीच मदत होईल व संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात नवचैतन्य निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

उपायुक्त (मुख्यालय) कल्पना पिंपळे यांच्या प्रयत्नातून महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी निर्णय प्रक्रिया पूर्ण केली.

# शहापुरातील डोळखांब परिसरात बिबट्याचा वावर

◆ **शहापुर (वार्ताहर) :**



शहापूर तालुक्यातील डोळखांब वनपरीक्षेत्र हद्दीत डेहणे आज्या डोंगररांगा परिसरात साकुर्लीच्या ग्रामस्थांना बिबटयाचे दर्शन झाल्याने जंगल परिसरात फिरताना नागरिकांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे. शहापूर तालुक्यातील डोळखांब वनपरीक्षेत्राचे भौगोलीक क्षेत्रफळ १० हजार ५०० हेक्टरपर्यंत विस्तारले असून, ठाणे व अहिल्यानगर जिल्ह्याच्या सरहद्दीपर्यंत घनदाट राखीव वनक्षेत्र आहे. या डेहणे गाव हद्दीत आज्या डोंगररांगांमध्ये रामायणकार वाल्मीक ऋषींच्या समाधीचे स्थळ, लव-कुश यांच्या पाळण्याचे ठिकाण असल्याचे सांगण्यात येते. अनेक पर्यटक, भक्तगणांची या भागात नियमित वर्दळ असते. डोळखांब वन विभागाचे अधिकारी नेहमीप्रमाणे गुंडे, डेहणे भागात वन परिक्षेत्रात गस्त घालत होते. त्यांना या भागात वन विभागाकडून लावण्यात आलेल्या जंगली प्राणी खेचक (ट्रॅप) कॅमेऱ्यांमध्ये बिबट्याच्या हालचाली दिसून आल्या. गुंडे, डेहणे हद्दीत बिबट्याचा संचार असल्याची माहिती वन कर्मचाऱ्यांनी तातडीने डोळखांब वन विभागाचे परिक्षेत्र अधिकारी अजय चव्हाण यांना दिली.

यावर्षी अवकाळी पडलेल्या पावसाने जंगलात शेवळी,तेलपाट, कुर्डू, कंदमुळे, रानभाज्या उगवल्या असून, अनेक महिला, नागरिक ती आणण्यासाठी जंगलात जात असतात. शेतकऱ्यांची शेतीची कामे सुरू झाली आहेत. बहुतांशी शेतकऱ्यांची शेती जंगल भागात आहे. अनेक शेतकऱ्यांचे पशुधन दिवसा जंगल भागात चरायला नेले जाते.

या सर्व बाबींचा विचार करून डोळखांब वन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी डोळखांब परिसरातील मुख्य वर्दळीचे रस्ते, गाव पाडे हद्दीत बिबट्यापासून सावध राहण्याचे फलक लावले आहेत. गाव, आदिवासी पाड्यांमध्ये वन कर्मचारी जाऊन ग्रामस्थांना एकत्रित करून बिबट्याचा वावर परिसरात असल्याने घ्यावयाची काळजी याविषयीची माहिती ग्रामस्थांना देत आहेत.

### नैना प्रकल्पातील सुनावणीस मुदतवाढ

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रभाव क्षेत्रात विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोची शासनामार्फत १० जानेवारी २०१३ रोजी नियुक्ती करण्यात आली. या नियोजन प्रक्रियेचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे नैना क्षेत्रातील नगररचना परियोजनांची अंमलबजावणी. सदर नैना क्षेत्रात सद्यस्थितीत एकूण १२ नगररचना परियोजना राबविण्यात येत असून, यातील परियोजना क्र. ८, ९, १०, ११ आणि १२ या योजनांसाठी लवादांची सुनावणी अंतिम टप्प्यात आहे. काही जमीनधारक विविध कारणांमुळे याआधीच्या सुनावणीत सहभागी होऊ शकले नाहीत. त्यांना संधी मिळावी म्हणून सिडकोने यापूर्वी ३० मे २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली होती. लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार व हितधारकांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सिडको आता ही सुनावणी अंतिमतः ३० जून २०२५पर्यंत वाढवत आहे. ही अंतिम मुदत आहे. म्हणूनच सिडको सर्व संबंधित भूधारक, नागरिक आणि हितधारकांना आवाहन करत आहे की, त्यांनी या संधीचा लाभ घेत आपले म्हणणे मांडण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, जेणेकरून या महत्त्वपूर्ण प्रकल्पात त्यांचा सक्रिय सहभाग आणि हितसंपादन होऊ शकेल. सुनावणीसाठी कृपया आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत - सकाळी ११ ते संध्याकाळी ५ दरम्यान - सिडको नैना कार्यालय, टॉवर क्रमांक १०, ७ वा मजला, रेल्वे स्थानक संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे संपर्क साधावा.

### मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून ‘वीड टू वेल्थ’ प्रकल्पाची पाहणी

# जलपर्णीपासून परिवर्तनाची दिशा; रोजगार, स्वाभिमान, सशक्तीकरण

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (UMED) अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील वरप येथे नाविन्यपूर्ण निरुपयोगी जलपर्णी पासून उपयुक्त हस्तकला प्रशिक्षण व रोजगार निर्मिती प्रकल्प ‘वीड टू वेल्थ’ अजय बहुउद्देशीय संस्था यांच्या मदतीने राबविण्यात येत आहे. या प्रकल्पास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वी.योजना छायादेवी शिसोदे यांनी सदिच्छा भेट दिली. या वेळी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधण्यात आला व महिलांनी तयार केलेल्या वस्तूंची पाहणी करून त्यांचे कौतुक करण्यात आले.





यावेळी बोलताना रोहन घुगे म्हणाले, "समाजोपयोगी व संसार उपयोगी वस्तू बनविण्याची कल्पना सुचली आणि आज, महिलांना हा जगण्याचा मार्ग मिळाला आहे. महिलांना स्वबळावर उभं करण्यासाठी हा रोजगार अत्यंत महत्त्वाचा आहे. ते पुढे म्हणाले, "आपण तयार करत असलेल्या वस्तूंना बाजारपेठेत चांगली मागणी आहे. आपल्याकडे जलपर्णीचा कच्चा माल मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे आणि तुम्हीच पुढाकार घेऊन या कामाला उंचावर घेऊन जाणार आहात. त्यामुळे भविष्यात आपले जीवन सुखकर आणि संपन्न होईल याची खात्री आहे."

प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे म्हणाल्या, "हे सर्व जणू स्वप्नवत वाटते. याआधी जलपर्णीविषयी अनेक उच्चस्तरीय बैठकांचे आयोजन झाले, पण त्याचे पुढे काही घडले नाही. मात्र रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने व पुढाकारामुळे हा प्रश्न मार्गी लागला आणि आज आपण त्याचे यशस्वी रूप प्रत्यक्ष पाहत आहोत. महिलांचा वाढता सहभाग आणि सकारात्मक प्रतिसाद पाहून अत्यंत समाधान वाटते."या उपक्रमामुळे महिलांना स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत असून त्यांच्यात उद्योजकता विकसित होण्यास मदत होत आहे. हा प्रकल्प केवळ उपजीविकेचा नव्हे, तर स्वाभिमानाचा आणि सशक्तीकरणाचा मार्ग बनला आहे, असे मत जय शिवराय स्वयं सहायता समूहाचे (म्हारळ) वर्षा शिरसाठ यांनी व्यक्त केले.

गट विकास अधिकारी (कल्याण) संजय भोये, गट विकास अधिकारी (अंबरनाथ) पंडित राठोड, सहाय्यक गट विकास अधिकारी (कल्याण) रघुनाथ गवारी, विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), कल्याण पराग भोसले, विस्तार अधिकारी, उमेद, जिल्हा अभियान व्यवस्थापक, ठाणे सारिका भोसले, तसेच BMM, BM, CC स्टाफ, कल्याण व अंबरनाथ व बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयपीएल विजयाची 'विराट' स्वप्नपूर्ती

भारतात तब्बल १८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आयपीएल चषकावर आपले नाव कोरण्याचा मान रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाला मिळाला आहे. यापूर्वी तब्बल तीन वेळा आयपीएलच्या अंतिम सामन्यात जाऊनही विजेतेपद न मिळाल्याची खंत आरसीबीच्या प्रत्येक खेळाडूच्या मनामध्ये होती. विराट कोहलीसारखा जागतिक दर्जाचा नावाजलेला खेळाडू संघात असतानाही आरसीबीला १७ वर्षे आयपीएल चषक हुलकावणी देत होता, याची कुठेतरी नाराजी आयपीएल प्रेमींच्या मनामध्येही होतीच. अखेर तो दिवस उजाडलाच, ज्या दिवसाची आरसीबीच्या संघाने, संघमालकाने, संघाच्या चाहत्यांनी प्रतीक्षा केली होती. ३ जून रोजी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यामध्ये आरसीबीने पंजाबचा ६ धावांनी पराभव करत आयपीएलच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. मंगळवारी रात्री कर्नाटकमध्ये अक्षरशः दिवाळी साजरी झाली. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने इंडियन प्रीमिअर लीग २०२५ च्या जेतेपदाला गवसणी घातली आणि देशभरात आरसीबीच्या चाहत्यांनी जल्लोष केला. अहमदाबादचे नरेंद्र मोदी स्टेडियम हे आरसीबीच्या चाहत्यांनीच खचाखच भरले होते आणि मध्यरात्री जेतेपदाची ट्रॉफी उंचावताना संघाला पाहण्यासाठी ते शेवटपर्यंत स्टेडियमवरच थांबले होते. अहमदाबाद जणू बंगळूरु फ्रँचायझीचे होम ग्राऊंड आहे असेच भासत होते.

तिथे कर्नाटकमध्येही जल्लोष झाला. चाहते रस्त्यावर उतरून आनंद साजरा करत होते. आयपीएलच्या अंतिम सामन्यात कधीही विजेतेपद न मिळवलेले दोन संघ खेळत होते. त्यामुळे यंदा आयपीएलला नवा विजेता मिळणार यावर शिक्कामोर्तब झाले होते. आरसीबीने विजयासाठी दिलेले १९१ धावांचे आव्हान पंजाब किंग्जला पेलवले नाही आणि पंजाब किंग्जने १८४ धावांपर्यंत मजल मारली. हा विजय विराट कोहलीसाठी खूप आवश्यक होता. विराट कोहली आणि आरसीबीचे असलेले नाते आयपीएल सुरू झाल्यापासून गेली १८ वर्षे 'फेव्हिकोल'च्या मजबूत जोडसारखे घट्ट होते आणि आजही आहे. त्यामुळे अखेरच्या टप्प्यात विजय जसजसा निश्चित होत गेला, तसतसे विराट कोहलीच्या चेहऱ्यावरील भाव बदलत होते. विजय होताच विराट कोहली लहान मुलासारखा ओक्साबोक्सी रडला, अर्थात तब्बल १८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मिळालेल्या यशाबाबतचे ते आनंदाश्रू होते. आरसीबीच्या विजयामुळे विराट कोहलीला आनंदाश्रू अनावर झाले. आरसीबीच्या विजेतेपदाचा शिलेदार आणि नेता म्हणून रजत पाटीदार याची देखील कामगिरी महत्त्वाची ठरली. रजत पाटीदार याने विराट कोहलीसाठी आयपीएलचे विजेतेपद मिळवणार असे म्हटले होते. ते त्याने सांघिक कामगिरीच्या जोरावर करून दाखवले. रजत पाटीदारने यंदा पहिल्या हंगामात आरसीबीचे नेतृत्व केले. रजत पाटीदार काही सामन्यांमध्ये खेळला नव्हता. मात्र क्वालिफायर आणि फायनलमध्ये रजत पाटीदारने संघाचे नेतृत्व केले. रजत पाटीदारने अंतिम सामन्यात वेळोवेळी गोलंदाजीमध्ये बदल करत पंजाबच्या फलंदाजांना खेळपट्टीवर जम बसवू दिला नाही. रजत पाटीदारने स्पिन गोलंदाजी आणि वेगवान गोलंदाजी याचा योग्य पद्धतीने वापर केला. रजत पाटीदार याने आयपीएल फायनल पूर्वी पत्रकार परिषदेत आम्ही प्रयत्न करू आणि विराट कोहलीसाठी जिंकू, असे म्हटले होते. भारतीय क्रिकेट संघ आणि आरसीबीसाठी विराट कोहलीने अनेक वर्षे खूप योगदान दिले आहे, त्याच्यासाठी आयपीएल विजेतेपद मिळवायचेच, असे रजत पाटीदार म्हणाला होता. त्याने त्याचा शब्द पूर्ण केला.

यशस्वी पुरुषाच्या मागे एका महिलेचा हात असतो, हे नेहमीच म्हटले जाते. पण आयपीएल आरसीबीने जिंकल्यावर त्याची पुन्हा प्रचिती आली. विराट कोहलीची पत्नी व प्रसिद्ध हिंदी सिने अभिनेत्री अनुष्का शर्मा ही देखील गेली अनेक वर्षे विराटच्या व आरसीबीच्या समर्थनार्थ सामन्यासाठी क्रीडांगणावर हजर असायची. या विजयासह बंगळूरुचे आणि या संघाचा गेली १८ वर्षे भाग असणाऱ्या विराट कोहलीचे स्वप्न साकार झाले. मंगळवारी आरसीबीने पंजाब किंग्जचा पराभव करून आयपीएल २०२५ ट्रॉफी जिंकली आणि इतिहास रचला. विराट कोहलीचा संघ आरसीबीने ट्रॉफी पटकावताच अनुष्काच्या आनंदाला पारावार उरला नाही. सामना जिंकताच विराट कोहली हमसून हमसून रडू लागला. त्यानंतर त्याने धावत जाऊन पत्नी अनुष्काला कडकडून मिठी मारली. २०१७ मध्ये लग्न झालेल्या या जोडप्याने अनेकदा एकमेकांच्या कारकिर्दीला पाठिंबा दिला आणि त्यांचे कौतुक केले. आरसीबीने आयपीएल ट्रॉफी जिंकताच विराट कोहली या विजयाच्या क्षणी भावुक झाला आणि या विजयाचे श्रेय त्याची पत्नी आणि अभिनेत्री अनुष्का शर्माला देत म्हणाला की, ती २०१४ पासून इथे येतेय आणि आरसीबीला सपोर्ट करतेय, म्हणून तिलाही १८ वर्षे झाली आहेत. ती सतत तिथे असायची. न चुकता सामने पाहायला येणे, आम्हाला हरताना पाहणे, तुमचा लाईफ पार्टनर तुमच्या खेळासाठी काय करतोय, त्याग करण्यासाठी, वचनबद्धतेसाठी आणि प्रत्येक कठीण काळात तुम्हाला पाठिंबा देण्यासाठी काय करतो? हे असे काहीतरी आहे, जे तुम्ही शब्दांत वर्णन करू शकत नसल्याचे सांगत या विजयाचे श्रेय त्याने अनुष्काला दिले. अंतिम सामन्यात हार-जीत ही होतच असते. कोणाचा तरी विजय म्हटल्यावर कोणाचा तरी पराभव हा ठरलेलाच असतो. पंजाब किंग्जचा पराभव झाला असला तरी त्यांची वाटचालदेखील संघर्षाचीच राहिलेली आहे. आयपीएल सुरू झाल्यापासून त्यांना देखील एकदाही आयपीएल चषक जिंकता आलेला नाही. त्यांनी देखील विजयासाठी अथक प्रयत्न केले. अवघ्या सहा धावांनी त्यांचे प्रयत्न कमी पडल्याने त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या पंजाब किंग्जनेदेखील स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आहे. क्वालिफाय सामन्यात अंबानीच्या मुंबई इंडियन्सला पराभूत करत त्यांनी अंतिम फेरी गाठली होती. आयपीएल स्पर्धा संपली असली तरी भारताला या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक चांगल्या खेळाडूंचा शोध लागला आहे. रोहित शर्मा, कोहली, रवींद्र जडेजाच्या निवृत्तीनंतर पोकळी कोण भरून काढणार, याचे उत्तरदेखील या स्पर्धेतच भारताच्या निवड समितीला निश्चितच सापडले असणार.

# चीन-पाक कॉरिडॉरमध्ये अफगाणचा प्रवेश

चीनने व्यापारवृद्धीसाठी, दक्षिण आशियाई देशांना अधिक जवळ आणण्यासाठी आणि पाकिस्तानमधील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी एक मोठा द्विपक्षीय प्रकल्प राबवला आहे. २०१५ मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉर म्हणून प्रसिद्ध असा हा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. पाकिस्तानच्या पायाभूत सुविधांचा विकास करताना चीनची ऊर्जा आयात आणि व्यापार वाढवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये ग्वादर आणि कराचीमधील बंदरांना उत्तर पाकिस्तान आणि चीनच्या शिनजियांग प्रदेशाशी जोडणारे आधुनिक वाहतूक नेटवर्क समाविष्ट आहे. बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह अंतर्गत या कॉरिडॉरमध्ये चीनने सुमारे ६५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक प्रामुख्याने ऊर्जा प्रकल्पांसह पायाभूत सुविधांच्या विकासावर केंद्रित आहे. याचा मोठा भाग वीज निर्मितीकडे जातो. २०२१मध्ये तालिबानने अफगाणिस्तानवर पुन्हा नियंत्रण मिळवल्यानंतर २०२५ पर्यंत इतर सर्व देशांप्रमाणे चीनने पुनर्स्थापित इस्लामिक अमिरातीला मान्यता दिली नाही, परंतु देशात त्यांच्या दूतावासाला काम करण्याची परवानगी दिली. मान्यता नसतानाही चीन तालिबान सरकारशी व्यापार, गुंतवणूक आणि मदतीच्या मुद्द्यांवर वाटाघाटी करतो. अफगाणिस्तानच्या खाण क्षेत्रातील सर्वात मोठे गुंतवणूकदार म्हणजे उझबेकिस्तान, तुर्की, चीन आणि इराणमधील कंपन्या; ज्यांनी तेल आणि वायू, सिमेंट प्रकल्प आणि तांबे, सोने आणि लोखंडाच्या खाणींमध्ये गुंतवणूक केली आहे. अफगाणिस्तानमध्ये तेलाचे साठेदेखील आहेत. विशेषतः उत्तर अफगाणिस्तानमध्ये, विशेषतः बल्ख आणि जाव्झान प्रांतांमध्ये अंदाजे १.८ अब्ज बॅरल तेल आहे, चीनची या तेलसाठ्यांवर आणि खाणींवर नजर आहे. या दृष्टीने पाऊल टाकत चीनने अफगाणिस्तानला चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉरमध्ये सामील करून घ्यायचा निर्णय घेतला आहे.

समुद्र आणि जमिनीवर आधारित चीनच्या कॉरिडॉरचा मुख्य उद्देश मध्यपूर्वेतून चीनच्या ऊर्जाआयातीचा मार्ग सुरक्षित आणि कमी अंतराचा करणे हा आहे. मलेशिया आणि इंडोनेशिया दरम्यान मलाक्का सामुद्रधुनीतून जाणारा विद्यमान मार्ग युद्धाच्या प्रसंगी बंद होऊ शकतो. त्यामुळे चीनच्या ऊर्जा-अवलंबित अर्थव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो. पाकिस्तान आणि चीनने चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारित करण्यास सहमती दर्शवली आहे. तिन्ही राष्ट्रांमधील त्रिपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्याचे हे प्रयत्न असल्याचे चीन भासवत असला तरी भारताशी असलेले वैर आणि विस्तारवाद हा चीनचा छुपा अजेंडा आहे. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर हा भारताच्या हद्दीत येणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने भारतासाठी सार्वभौमत्व आणि सुरक्षेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. सीपीईसीचे काम भारताच्या सहभागाशिवाय प्रगतिपथावर आहे, जे गंभीर चिंतेचा विषय बनले आहे. चीनच्या पथ्यावर पडलेली आणखी एक घटना म्हणजे



चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉर या भारतासाठी डोकेदुखी ठरू पाहणाऱ्या भागीदारीत आता अफगाणिस्तानची भर पडली आहे. चीन हा कॉरिडॉर त्रिपक्षीय विकास योजना म्हणून भासवत असला तरी भारताशी असलेले वैर आणि विस्तारवाद हा त्यामागील छुपा अजेंडा आहे. हा कॉरिडॉर भारताच्या हद्दीत येणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने सार्वभौमत्व आणि सुरक्षेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**शंतनू चिंचाळकर**

अलीकडच्या एका अहवालात पाकिस्तानने त्याच्या प्रादेशिक पाण्यात मोठ्या प्रमाणात तेल आणि वायूचे साठे शोधले असल्याचे सूचित केले आहे. हे जगातील सर्वात मोठ्या साठ्यांपैकी एक असू शकतात. युनायटेड स्टेट्स एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशनच्या मते पाकिस्तानकडे नऊ अब्ज बॅरलपेक्षा जास्त पेट्रोलियम तेल आणि १०५ ट्रिलियन घनफूट नैसर्गिक वायूचे साठे आहेत. हे लक्षात घेता भारताला या कॉरिडॉर त्रिकुटापासून सावध राहावे लागेल.

तालिबानच्या नेतृत्वाखालील इस्लामिक अमिरात ऑफ अफगाणिस्तान आता सत्तेमध्ये चौथे वर्षे पूर्ण करण्याच्या तयारीत आहे. गेल्या चार वर्षांमध्ये या राजवटीपर्यंत भारताची पोहोच हळूहळू वाढत गेली. आता ती अधिक थेट पण सावध व्यावहारिक सहभागामध्ये रूपांतरित झाली आहे. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर आणि आयईएचे अंतरिम परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्यातील अलीकडच्या फोन कॉलने या भागीदारीतील एक महत्त्वाचा टप्पा गाठला. भारत-अफगाण दरम्यानचे हे व्यापारी संबंध चीन आणि पाकिस्तानला सलत आहेत. भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केल्याबद्दल मुत्ताकी यांचे आभार मानले आणि दोन्ही देशांमध्ये अविश्वास निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर विश्वास न ठेवल्याबद्दल कौतुक केले. याला पाकिस्तानने केलेल्या दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचा अप्रत्यक्ष संदर्भ आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने तालिबानला मानवतावादी आणि विकास सहकार्य हळूहळू वाढवण्याचे वचन दिले आहे.

या वर्षी जानेवारीमध्ये परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दुबईमध्ये मुत्ताकी यांची भेट घेतली. ही दोन्ही बाजूंमधील सर्वोच्चस्तरीय बैठक होती. डिसेंबर २०२४ मध्ये हल्ले आणि प्रतिहल्ल्यांनंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील संबंध बिघडल्यानंतर ही बैठक होत आहे. काबूलमधील पाकिस्तानचा प्रभाव कमी झाल्यामुळे भारताला आपला सहभाग वाढवण्यासाठी आणि या प्रदेशात आपले धोरणात्मक आणि सुरक्षा हितसंबंध अधिक चांगल्या प्रकारे सुरक्षित करण्याची संधी मिळाली. व्यापारासाठी अफगाणिस्तानच्या चाबहार बंदराचे महत्त्व, अफगाणिस्तानला मानवतावादी मदत पोहोचवणे आणि काबूलला इस्लामाबादवरील अत्यधिक अवलंबित्वातून मुक्त करणे यानिमित्ताने भारताने सहकार्याचे एक पर्व सुरु केले. आता भारताने या बाबींवर भर देऊन अफगाणिस्तानशी व्यापार संबंध बळकट करण्याची आवश्यकता आहे. अर्थात असे असले तरी, या प्रदेशातील इतर देश, खासकरून चीन, तालिबान आणि अफगाणिस्तानशी संबंध प्रस्थापित करण्याकामी अधिक सक्रिय आहे. रशियाने अलीकडेच तालिबानला दहशतवादी संघटनांच्या यादीतून काढून टाकले आहे. इराण आणि मध्य आशियाई प्रजासत्ताक, जसे की कझाकस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, ताजिकिस्तान यांनीही अफगाणिस्तानशी संपर्क वाढवला आहे. तालिबानदेखील या घडामोडींचा फायदा घेत आहे, परस्पर हितसंबंधांवर आधारित तटस्थ परराष्ट्र धोरणाचा पुनरुच्चार करत आहे.

चीन आपला आर्थिक कॉरिडॉर नजरेसमोर ठेऊन पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यामधील संबं सुधारण्यासाठी मध्यस्थ म्हणून भूमिका पार पाड आहे. म्हणूनच दोन पारंपरिक शत्रूंशी अफगाणिस्तानच वाढत्या जवळीकीकडे भारताला काटेकोर लक्ष द्य लागणार आहे. गेल्या काही दिवसांमध्ये भारत अफगाणशी संपर्क वाढवला आहे. २७ एप्रिल रो परराष्ट्र मंत्रालयाच्या संयुक्त सचिवांच्या नेतृत्वाखाली भारतीय शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीनंतर मुत्ता पाकिस्तान आणि चीनशीही संवाद साधत आहेत. १ मे रोजी काबूलमध्ये पाकिस्तान आणि चीनच्या विशे प्रतिनिधींच्या बैठकीनंतर पाकिस्तानचे उपपंतप्रध आणि परराष्ट्रमंत्री मोहम्मद इशाक दार आणि मुत्ता यांनी २०-२१ मे रोजी चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यांच्याशी त्रिपक्षीय सल्लामसलत करण्यासाठी चीनमध भेट घेतली. यावेळी परस्पर हितसंबंध आणि चांगल शेजाराच्या आधारावर संबंध विकसित करण्याच वचनबद्धतेचा तिन्ही बाजूंनी पुनरुच्चार केला. त्यां आर्थिक तसेच संपर्क राखण्याच्या आघाड्यांवर सहक वाढवण्याचे ठरवले आणि चीन-पाकिस्तान आर्थि कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारण्यास सहम दर्शवली. भारताच्या दृष्टीने या निर्णयाला महत्त्व आ ही उपद्रवी राष्ट्रे एकत्र येत असल्याने अफगाणिस्तान असलेले संबंध वाढवण्याच्या दृष्टीने भारताची कसो लागणार आहे.

गेल्या साडेतीन वर्षांमध्ये अफगाणिस्तान आ पाकिस्तानमधील संबंध लक्षणीयरीत्या बिघडले आहे मात्र तरीही दोन्ही बाजू प्रश्न सोडवण्याचा आ एकमेकांशी पुन्हा संपर्क प्रस्थापित करण्याचा प्रय करत आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षान पाकिस्तान आणि अफगाणिस्तानला पुन्हा आपल हद्दीत समाविष्ट करण्याचा चीनचा प्रयत्न भारतासा अडचणीचा ठरू शकतो.

भारताशी प्रस्थापित केलेले चांगले संब अफगाणिस्तानला पाकिस्तानपासून स्वावलंबन मिळव देतात; परंतु तालिबानशी असलेले संबंध आपल्याला ह असलेले फायदे देऊ शकतात का, यावर भारताची कड नजर असणे आवश्यक आहे. या आर्थिक कॉरिडॉर भारताच्या दृष्टीने जमेची बाजू म्हणजे पाकिस्तानी आ चिनी निवेदनांमध्ये सर्व प्रकारच्या दहशतवादाला विरो आणि त्याचा सामना करण्याची त्यांची वचनबद्धता नम करण्यात आली. मुत्ताकी यांनी वांग यी यांच्यासोबतच द्विपक्षीय बैठकीत अफगाणिस्तानची भूमी त्यांच कोणत्याही शेजारी देशांविरुद्ध वापरण्याची परवान दिली जाणार नाही, असेही वचन दिले. भारता अफगाणिस्तानशी संबंध वाढवताना अल कायदासारख गटांच्या उपस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या धोक्या जाणीवदेखील असली पाहिजे. अफगाणिस्तानम अजूनही अनेक दहशतवादी संघटना कार्यरत आहे त्यांचे भारताशी वैर जगजाहीर आहे. यामुळे नवी दिल्ली मोठ्या धोक्यापासून सावध राहावे लागणार आहे.

# महायुती जोमात, आघाडी कोमात...!

महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती अशा सर्वच स्वायत्त संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. यामुळे राज्यातील स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात येतील. प्रभाग रचना आदी निवडणुकांचे सर्व सोपस्कार पूर्ण करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. यामुळे आक्टोबर-नोव्हेंबरपर्यंत निवडणुका होतील असा अंदाज वर्तविला जात आहे. महाराष्ट्रातील स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदेगट, राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवारगट) आरपीआय आठवले गट या महायुतीतील घटक पक्षांनी आगामी निवडणुकांना सामोरे जाण्याची तयारी दाखवली आहे. यासाठी जोरदार तयारी सुरू झाली आहे. महाराष्ट्रातील गेल्या काही वर्षांत बदलत गेलेले राजकारण पाहता कोणत्या पक्षाशी कोणाशी युती होईल, आघाडीत जातील हे कोणालाच सांगता येणारे नाही. असं बेभरवशाचं आणि अस्थिरतेचं राजकारण झालं आहे. यातच पक्षीय काम कार्यकर्त्यांना ३६५ दिवस गुंतवून ठेवण्याच्या भाजपाच्या कार्यपद्धतीमुळे भाजपा नेहमीच अलर्ट मोडवर राहाते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेनाही निवडणुकांसाठी सतर्क आहे. कोकणाच्या राजकारणाचा विचार करता पालघर, रायगड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या पाचही जिल्ह्यात भाजपा-शिवसेनेचे नेटवर्क चांगले आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुका वेगळ्या पद्धतीने लढवल्या जातात. त्या निवडणुकीतील प्रचाराचे मुद्दे सर्वच काही वेगळे असत. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील निकष आणि लोकांच्या अपेक्षा, उमेदवार याच निवडणुकीच गणितही वेगळे राहात. मधल्या बऱ्याच कालावधीनंतर मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील सर्वच स्वराज्य संस्थाच्या निवडणुका होत आहेत. मधल्या कालावधीत या स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासकीय कारभार होता. प्रशासनातील अधिकारी काय ठरवतील तेच फायनल असा कारभार राहिला. याचा फटका निश्चितच सर्वसामान्य जनतेला बसला. यामुळे स्वराज्य संस्थांमध्ये काम करायला इच्छुक आणि उत्सुक असणाऱ्यांनी गेल्या काही महिन्यांत संपर्क वाढवायला सुरुवात केली आहे. एकिकडे महायुती आगामी होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी तयारीत आहे. कोकणात शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा फारसा प्रभाव नाही. मोजके




कार्यकर्ते, ठरावीक तेच पुढारी कोकणात आहेत. या मोजक्या पुढाऱ्यांकडेही मोजकेच कार्यकर्ते आहेत. पक्ष वाढवण्यासाठी राष्ट्रवादीकडे कोणता कार्यक्रम नाही किंवा तसे कोणाचे प्रयत्नही नाही. यामुळे महायुतीतील भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गटाचा पक्षीय आलेख नेहमीच चढता राहिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती म्हणून या आगामी निवडणुकीला सामोरे जातील हे स्पष्ट केले. त्याचवेळी महायुतीतही स्थानिक स्तरावर मैत्रीपूर्ण लढतीची शक्यताही त्यांनी नाकारली नाही. त्यामुळे आगामी स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीमध्ये कोकणातही महायुतीतील सर्वच पक्षांमध्ये सर्वच स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इच्छुकांची भाऊगर्दी आहे. एका जागेसाठी अनेक इच्छुक अशी स्थिती आहे. यामुळे स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारी मिळविण्यासाठी निश्चितच मोठी रस्सीखेच असेल.



**माझे कोकण**

**संतोष वायंगणकर**

भाजपाकडून कोकणात पक्षीय वाढीसाठी जोरदार प्रयत्न होत आहेत. तसे ते शिवसेना शिंदे गटाकडूनही होत आहेत. राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे या तीन पक्षांतील कार्यकर्त्यांना आपापल्या पक्षात ओढण्याचे प्रयत्न केले जात आहेत. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची कोकणातील स्थिती फारच नाजूक आहे. फक्त अस्तित्व आणि नावापुरतेच हे पक्ष उरले आहेत. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेनाही कोकणात अस्तित्वासाठी धडपडत आहे. सेनेच्या नेते, पुढाऱ्यांच्या पत्रकार परिषद, पत्रक यातूनच शिवसेना उबाठाच अस्तित्व आहे. शिवसैनिकांना ऊर्जा देईल असं कोकणातील उबाठात नेतृत्व नाही. विकासातील नकारात्मकता यामुळे कोकणातील जनता शिवसेनेचे नेते फक्त विरोधासाठी विरोधाची भूमिका घेतात. हे सेना नेते, पुढाऱ्यांच्या राजकीय स्टेटमेंटवरून स्पष्ट होते. यामुळे कोकणातील महाविकास आघाडीतील सर्वच राजकीय पक्ष सध्या कोमात आहेत. महाविकास आघाडीतील नेतृत्व करणाऱ्यांसोबत कार्यकर्ते उरले नाहीत हे स्पष्टपणे दिसून येत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी आवश्यक असणारी कोणतीही मानसिकता कोकणातील महाविकास आघाडीतील नेत्यांची दिसत नाही.

पक्ष बळकट करण्यासाठी नेतृत्वाकडुन काही विधायक आणि सकारात्मक काम जनतेसमोर ठेवावं लागतं. कोकणातील जनतेच्या मनात कोकणचा विकास कोण करू शकतो याच्या संबंधीची एक विश्वासाची भावना आहे. यामुळे विकासाचा विचार आणि विश्वास महाविकास आघाडीकडून कधीच देण्यात आला नाही. कोकणच्या विकासाला मिळालेली गती, राबवण्यात आलेले प्रकल्प, प्रत्येक भागातील समतोल विकासाचा होत असलेला प्रयत्न याचा एक सकारात्मक परिणाम स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत दिसून येतील. महायुतीतील सर्वच पक्ष आपल्या पद्धतीने निवडणुकीला सामोरे जाण्याचे प्रयत्न करतील. त्यात निश्चितच चढा-ओढही असेल. मात्र, महायुती स्वराज्य संस्थामधील सत्तास्थान आपल्याकडे आहेत. तशीच ती आपल्याकडेच राहायला पाहिजेत यासाठी प्रयत्न या निवडणुकीत होतील. महाविकास आघाडीतील घटकपक्ष विधानसभा निवडणुकीतील पराभवाच्या धक्यातून आजही सावरलेले दिसत नाहीत. यामुळेच भाजपा-शिवसेना शिंदेगट, राष्ट्रवादी अजित पवार गट जोमात आणि राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट, उद्धव बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना महाविकास आघाडी कोमात अशीच काहीशी आजच्या घडीची स्थिती आहे. जोमात असलेली महायुती आणि कोमात असलेली महाविकास आघाडी आगामी निवडणुकीला कोकणात कसे सामोरे जातात हे पाहणे औत्स्युक्याचे ठरणार आहे.

## राशिभविष्य

गुरुवार, ५ जून २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती ज्येष्ठ शुद्ध दशमी शके १९४७, चंद्र नक्षत्र हस्त, योग सिद्धी, चंद्र रास कन्या. गुरुवार दि. ५ जून, २०२५, सूर्योदय ६.००, सूर्यास्त ७.१३, चंद्रोदय २.२२, चंद्रास्त २.२ उद्याची राहू काळ २.१६ ते ३.५५, गंगा दशह समाप्ती, जागतिक पर्यावरण दिन. शुभ दिवस

### ॥ भविष्य ॥

**मेष** : आपले कार्यक्षेत्र विस्तारणार आहे. गुंतवणूक करताना काळजी घ्या.

**वृषभ** : आपल्यामध्ये काम करण्याची स्फूर्ती जास्त असेल.

**मिथुन** : व्यापार व्यवसायात नवीन तंत्र अमला आणावी लागतील.

**कर्क** : व्यापार व्यवसायातील अडचणी दूर होतील.

**सिंह** : विनाकारण जास्त विचार करू नका.

**कन्या** : आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. जोडीदाराकडे लक्ष ठेवा.

**तूळ** : नोकरीमध्ये सहकारी कामाची चालढक करण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** : कामांमध्ये सतर्क राहण्याची गरज आहे.

**धनू** : आपल्या कार्यक्षेत्रात नवीन आशादायक चित्र समोर येणार आहे.

**मकर** : कोणतेही काम काम करताना त्यामध्ये नीटनेटकेपणा असावा.

**कुंभ** : नवीन कामांकडे सातत्याने प्रयत्न करू यश लाभणार आहे.

**मीन** : एकाच वेळेस अनेक प्रस्ताव समोर येणार आहेत.

## जनसंवाद

### आई-बाबा हेच सुखाच्या वाटा आहेत...

संसार समुद्राच्या भरभक्कम काठावर आपले पाय हिमतीने रोवून सुखाच्या वाटेची चाहूल घेणारे, न पेलणारे ओझे घेऊन चालणारे, अपमान गिळत, वेदनांना काळजात दाबून, घरातील सर्वांचाच त्रास सहन करीत जगणारे ते. पुरुषालाही काळीज असते याचा विसर का पडतो? केवळ धमक्या ऐकून बधिर झालेले डोके बाहेर जाण्यासाठी अधीर होते, पण इलाज नसतो त्यांच्यासाठी कुणी आसवे गाळत नाहीत, किंबहुना त्यांच्या वेदना समजूनच घेत नाहीत; त्याच वेदनांना शिवलेल्या ओठात सर्वांच्या सुखासाठी एकतारी भजन गाणारे असतात बाबा अर्थात वडील. अशा संताला का कोणी समजून घेत नाही? जीवन निरुपयोगी झाल्यावर सातत्याने आई-बाबांनी किती अपमान सहन करीत राहायचे? म्हातारपण हे दुसरे बालपण असते. हे एकदा तरी मुलांनी समजून घ्यायला हवे. केवळ वृद्धाश्रम हा त्यावरचा उपाय नाही. उतारवयात त्यांना बळ मिळण्यासाठी हवी असते माया; कारण आपल्या जीवनातील तेच सुखाच्या वाटा आहेत.

– **अमोल करकरे,** खेड-रत्नागिरी

### कुत्र्यांकडे बघण्याची मानसिकता बदला

कुत्रा दिसला की मार दगड हे माणसाने थांबवावे. कुत्रा एक इमानदार प्राणी आहे हे अनेक घटनांवरून सिद्ध झाले आहे. रस्त्यावरून चालणारा कुत्रा भटका आहे हे मान्य पण त्याच्याकडे कधी मायेने पाहिले तर समजेल तो किती प्रामाणिक आहे. महानगरपालिकांच्या सार्वजनिक आरोग्य खात्याकडून कुत्रा पाळण्याचा अधिकृत परवाना मिळतो तो घेऊन त्याची रितसर नोंदणी होते. कल्याण-डोंबिवली महानगर क्षेत्रात वर्षभरात १४ हजार, तर तीन वर्षांत ५१ हजारांहून अधिक लोकांना श्वानदंश झाल्याची माहिती आहे. ही बाब चिंताजनक आहे. हिंदुशास्त्रात कुत्र्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्याला मारण्यापेक्षा प्रेमाने एखादे बिस्कीट खाऊ घाला तो तुम्हाला कधीच विसरणार नाही. तुम्हाला साथ देईल.

– **महादेव गोळवसकर,** कुर्ला

### नियतीही खूश होते अन्...

स्वप्नाचा ध्यास चिकाटीने धरून ठेवला की एक दिवस नियती देखील खूश होऊन यश बहाल करते. एकदाही फारकत न घेता रॉयल बरोबर लॉयल राहणाऱ्या विराटची १८ वर्षांची तपश्चर्या फळास आली आणि आयपीएल करंडकावर रॉयल चॅलेंजर्स, बँगलोरचे नाव कोरले गेले. चार वेळा अंतिम फेरीत धडक मारून देखील जेतेपद हुलकवणी देत राहिलं पण या पठ्ठ्याने जिद्द सोडली नाही. या वेळेस पाटीदारच्या नेतृत्वाखाली खेळताना विराटने सातत्य राखून आठ अर्धशतकं झळकवीत ८५७ धावा करून विजयात मोलाची भर घातली. मुंबईविरुद्धच्या अविस्मरणीय खेळाची पुनरावृत्ती करू न शकलेल्या श्रेयसचा अडसर शेफर्डने लगेचच दूर केला पण शशांकने मात्र शेवटी बंगलोरच्या तोंडचे पाणी पळवले होते. या विजयोत्सवात विराट डिव्हिलियर्स आणि क्रिस गेलचे योगदान अजिबात विसरला नाही हे विशेष.

– **हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर

### नवमतदारांना मतदानाचा हक्क हवा!

स्थानिक निवडणुकांसाठी नियमानुसार विधानसभा निवडणुकांसाठी निश्चित केलेली अंतिम मतदारयादीच वापरली जाणार आहे. त्यामुळे या निवडणुकांमध्ये नवमतदारांना मतदानाचा हक्क बजावता येणार नसल्याचे सांगितले जाते. मोठ्या कालावधीने होणाऱ्या स्थानिक निवडणुका सरकारच्या अनास्थेमुळे नवमतदारांना मतदानाचा हक्क बजावता येणार नाही. राज्य निवडणूक आयोगाला हे मान्य आहे का? सुमारे सात लाख नवमतदारांना या नियमाचा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जसे मतदानयंत्रांची सोय करत आहात त्याचप्रमाणे मतदार यादीत नवमतदारांचा समावेश करावा लागेल. विधानसभा निवडणुकांसाठी निश्चित केलेली अंतिम मतदारयादीच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीक आयोग जाहिरातीवर खर्च करुन मतदार करण्याचा हक्क बजावावा असे सांगत असताना स्थानिक निवडणुकांमध्ये नव मतदारांचा हक्क डावलल्यास नव मतदारांचा निवडणूक प्रक्रियेवर विश्वास राहणार नाही. नवमतदारांना लोकशाहीला मजबूत बनविण्यासाठी नवमतदारांना मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावावाच लागेल.

– **विवेक तवटे,** कळवा

### धारावी पुनर्वसनासाठी कुर्लाच का?

धारावी पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आता चांगलीच कंबर कसली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर धारावी म्हणजे आशिया खंडातील मोठी झोपडपट्टी म्हणून ओळख बनली. पण आता धारावीकरांचे पुनर्वसन कुर्ला डेअरीच्या मोकळ्या भूखंडावर करण्याचा निर्णय सरकारने नुकताच घेतलेला आहे. एकीकडे मुंबईतील गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांना मुंबईच्या बाहेर पुनर्वसन करण्यात सरकार धन्यता मानत आहे तर दुसरीकडे मात्र पर्यावरण बाबींचा विचार न करता तसेच स्थानिकांचा आणि विरोधकांचा विरोध डावलून सरकार धारावीकरांसाठी कुर्ला मदर डेअरीची मोक्याची जागा देत आहे. धारावी पुनर्विकास ही येणाऱ्या काळाची गरज आहे आपण समजू शकतो; परंतु त्यासाठी कुर्ला मदर डेअरीच्या मोकळ्या जागे केलेला आग्रह मात्र पर्यावरणविरोधी वाटत आहे.


– **संजय साळगांवकर,** मुं

### प्लास्टिक मुक्तीसाठी प्रयत्न आवश्यक

दिवसेंदिवस द्रुतगतीने ढासळत जाणाऱ् पर्यावरणाला वाचविण्यासाठी, त्याचे संवर्ध संरक्षण करण्याच्या संदर्भात जनजागृती करण्यासा दरवर्षी ५ जून रोजी जगभर जागतिक पर्याव दिन पाळला जातो. यंदाची जागतिक पर्याव दिन २०२५ ची थीम 'प्लास्टिक प्रदूषणाचा अ करणे' अशी आहे. जगभरात दैनंदिन वापरातल प्लास्टिकचे प्रमाण इतके वाढत गेले आहे क एका आकडेवारीनुसार पृथ्वीवर साठलेले एकू प्लास्टिक ८५० कोटी टनाच्या घरात पोहोचले आ हे सर्व आम्हाला माहीत आहे, पण ते ज्ञान फक कागदावरच राहिले आहे. अशावेळी प्लास्टि मुक्तीसाठी सर्वांनी आपापल्या परीने हातभ लावला पाहिजे. तोच यंदाच्या जागतिक पर्याव दिनाचा संदेश आहे.

– **प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधे

# ब्रह्मर्षी अंगिरस



आपल्या कौटुंबिक जीवनात जसे आपल्या आजोबांचे मानाचे, जिव्हाळ्याचे स्थान असते, तसेच आपल्या वैचारिक, बौद्धिक जीवनात ऋषींना स्थान आहे. ऋषी म्हणजेच ज्ञानाचा, पावित्र्याचा, साक्षात्कारी अनुभवांचा साठा होय, अशीच आपल्या मनात त्यांची प्रतिमा असते आणि ती खरीही आहे. एकेक ऋषी म्हणजे एकेक ज्ञानपीठ होय. या ऋषींकडे त्यांचे हजारो निवासी शिष्य असत. त्यांच्याकडून कठोर अध्ययन साधना करवून घेत ऋषींनी आपली ज्ञानगंगा प्रवाहित ठेवली. वेदमंत्रासारख्या दिव्य वाङ्मयाची शास्त्रशुद्ध संथा हे ऋषी आपल्या शिष्यांना देत असत. या शिष्यांचे अध्ययन पूर्ण झाले की, ते स्वतःच्या शिष्यांकरवी ही ज्ञानपालखी पुढे नेत असत. अशा या शिष्यपरंपरेने ऋषिप्रणित सर्व साहित्य आजही संजीवन राहिले आहे. या महान ऋषींचे फक्त आध्यात्मिक विषयावरच ग्रंथ आहेत असे नसून ज्ञानविज्ञानाच्या सर्व क्षेत्रात त्यांचे प्रबुद्ध वाङ्मय आहे. वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, औषधशास्त्र, स्थापत्य, खगोलशास्त्र, ज्योतिष, साहित्य, कला सर्वातच त्यांचे बहुमोल लेखन आहे आणि ते आजही उपलब्ध आहे.

आज आपण एका अत्यंत तेजस्वी ऋषीवरांची माहिती घेऊ या. त्यांचे नाव अंगिरस. हे ब्रह्माचे मानसपुत्र होत. यांची निर्मिती साक्षात अग्निदेवातून झाली, असे मानतात. अंगिरसांनी प्रदीर्घ काळ परब्रह्माचे ध्यान करीत तपश्चर्या केली. त्यामुळे त्यांना ब्रह्मतेज प्राप्त झाले होते. दक्ष प्रजापतीच्या कन्या स्मृतीव स्वधा यांच्याशी अंगिरसांचा विवाह झाला होता. यांना दहा पुत्र आणि सात कन्या होत्या. देवगुरु बृहस्पती अंगिरस ऋषींचेच पुत्र होत.

पृथ्वीवरील अग्नीचा शोध अंगिराऋषींनी लावला असे अत्रीमहर्षी म्हणतात,

जत्वां अग्ने अंगिरसः
गुहा हितं अनु अविन्दन्
शिश्रियाणं वने वने ।
सः जायसे मध्यमानः
सहः महत् त्वां आहुः
सहसः पुत्रं अंगिरः ।।ऋ. मं.५सू.१०.६



भारतीय ऋषी

**डॉ. अनुराधा कुलकर्णी**

हे अग्ने अरणीरूप गुहेमध्ये गुप्त असलेल्या व वृक्षावृक्षामध्ये राहणाऱ्या तुला अंगिराऋषींनी शोधून प्राप्त करून घेतले. दोन अरण्या एकमेकींवर सामर्थ्यपूर्वक घासून तू निर्माण होऊ शकतोस, याच कारणाने अंगिरा ऋषींनी तुला "बलपुत्र'' संबोधिले आहे.

अग्निपुत्र असलेले अत्यंत तेजस्वी ऋषी म्हणजे अंगिरस महर्षी हे होत. अग्नीतून निर्माण झाल्याने त्यांना अंगिरस नाव मिळाले.

ऋग्वेदात अंगिरसाच्या ऋषिकुळाचा गौरव केला असून सर्व आंगिरस ब्रह्मस्तोत्रे गाणारे व ब्रह्मदेवाचे पुरोहित आहेत, असे मंत्रद्रष्ट्या वसिष्ठांनी म्हटले आहे (७.४२) तसेच ऋग्वेदाच्याच दहाव्या मंडलातील बासष्टाव्या सूक्तात वेदमंत्रद्रष्टे मनुपुत्र नाभानेदिष्ठ यांनी अंगिरसांचे स्तवन केले आहे,

ये ऋतेन सूर्य आरोहयन् दिवि अप्रथयन् पृथिवीं मातरं वि ।

सुप्रजास्त्वं अंगिरसः वः अस्तु प्रति गृभ्णीत मानवं सुमेधसः ।।ऋ. मं.१०सू.६२.३

हे बुद्धिमान अंगिरस कुलोपन्न ऋषींनो, तुम्ही तुमच्या सत्यस्वरूप यज्ञीय सामर्थ्याने सर्वप्रेरक सूर्याची द्यू लोकात स्थापना केली आहे, सूर्यासारखेच तुम्ही जगात तळपत आहात. सर्व निर्मात्या भूमातेला तुम्ही तुमच्या सत्कार्यरूप यज्ञकर्मांनी समृद्ध व कीर्तिमान केले आहे. तुमच्या दिव्य संस्काराने तुम्हाला उत्तमच संतती प्राप्त होईल. मनुपुत्र नाभानेदिष्ठाचा तुम्ही कृपा करून स्वीकार करा. अंगिरस हे स्वायंभुव मन्वतरातील सप्तर्षींपैकी एक. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र. यांची ब्रह्माच्या डोक्यापासून उत्पत्ती झाली. हे ब्रह्म्याचे ज्येष्ठ पुत्र. यांना प्रजापतीही म्हणतात. भाद्रपद शुक्ल पंचमी ही अंगिरा (अंगिरस) जयंती. हिलाच ऋषीपंचमीही म्हणतात. अंगिरस चारही वेदांचे तज्ज्ञ होते. उपनिषदे, व्याकरण, पुराणे यातही त्यांचे कार्य होते. ते शंकराच्या वरदानाने उत्पन्न झाले.

**(पूर्वार्ध)**


(Email - anuradha.klkrn@gmail.com <mailto:anuradha.klkrn@gmail.com>)


---

**ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा !!**
**काय भुललासी वरलीया अंगा !!**

# काय भुललासी वरलीया अंगा !



संत चोखोबा मेळा महाराज यांच्या अभंगातील या ओळी... किती गाभार्थ आहे या ओळींमध्ये. ते म्हणतात "ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा." म्हणजे ऊस जरी दिसायला चांगला दिसत नसला, वाकडा तिकडा दिसत असला तरी त्याचा रस गोड असतो... म्हणून आपण त्याच्या वरच्या आवरणाला भुलू नये... जर आपण तसे न करता उसाच्या वरच्या आवरणाला भुललो म्हणजेच त्याचा आकार वाकडा आहे, कठीण आहे असं म्हणून जर त्याला खाऊन बघितले नाही तर त्याच्या आतल्या रसाची गोडी आपण कधीच चाखू शकणार नाही... ऊस आपण सगळेच खातो, त्याचा रस ही सगळे पितात; परंतु संत चोखोबांनी उसामधील गुण बघितले ते त्यांनी अभंगांमध्ये सहजपणे मांडले... किती सोप्या शब्दांत त्यांनी जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन उलगडून सांगितला आहे.

रंग, रूप, आकार ही सगळी बाह्य आवरणे आहेत. आपण नेमकं या आवरणांना भुलतो. अंतर्गुणांच मूल्यांकन करतच नाही.

बाजारात आपण एखादी वस्तू खरेदी करताना ती नीट पडताळून पाहातो, त्याचं मूल्यांकन करतो आणि मगच आपण ती खरेदी करतो. त्याचप्रमाणे जीवन जगताना आपल्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येक गोष्टींची किंवा व्यक्तींची पडताळणी करणे किंवा मूल्यांकन करणे गरजेचे आहे. काही गोष्टी कितीही सुंदर दिसत असल्या, तरी गरजेचे नाही की त्या तशाच असल्या पाहिजेत त्यांचे मूल्यांकन केल्यास समजतं की आपण समजलो त्यापेक्षा कितीतरी पटीने त्या गोष्टीचे मूल्यांकन कमी आहे; परंतु काही गोष्टी आपल्याला नकोशा वाटल्या, आवडत नसल्या तरी त्याचे मूल्यांकन केल्यास समजतं की आपण समजलो त्यापेक्षा कितीतरी पटीने त्या गोष्टींचे मूल्यांकन अधिक आहे. आपल्या डोळ्यांना दिसलेल्या प्रत्येक गोष्टीचे बाह्य स्वरूप जितके सुंदर आहे तितकेच तिचे अंतःस्वरूप देखील सुंदर असेल असे नाही ते कुरुप ही असू शकते. तसेच आपल्या डोळ्यांना दिसलेल्या प्रत्येक गोष्टीचे बाह्य स्वरूप जितके कुरुप तितकेच तिचे अंतःस्वरूप कुरुपच असेल असे नाही ते सुंदर ही असू शकते. हीच गोष्ट आपल्या सान्निध्यात येणाऱ्या व्यक्तींसाठी लागू होते. आपल्या आयुष्यात जन्मापासून ते मृत्यूपर्यंत कितीतरी व्यक्ती येतात, जातात पण आपण त्यांना पडताळून पाहात नाही किंवा त्यांच्यातील गुणांचे मूल्यांकन करत नाही. आपल्याकडे एक म्हण आहे "जे चकाकते ते सारे सोने नसते" ही म्हण आपल्या दैनंदिन जीवनात खूप उपयोगाची आहे. आपल्या सान्निध्यात येणाऱ्या व्यक्ती मग त्या ओळखीच्या असोत अथवा अनोळखी असोत आपण त्यांचे स्वरूप अथवा चरित्र त्यांच्या वरवरच्या दिसण्यावर ठरवू नये. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आपल्याला अनेक लोक भेटतात. सुरुवातीला ते लोक खूप प्रेमळ आणि मैत्रीपूर्ण व्यवहार आपल्याबरोबर ठेवतात; परंतु जेव्हा आपण त्यांना ओळखायला लागतो तेव्हा आपल्याला त्यांच्यातले गुण, त्यांचा स्वभाव दिसू लागतो आणि तेव्हा कळतं की ते जे दिसत होतं ते फसवं होतं. त्यांचे खरं अंतःस्वरूप त्यांच्या बाह्य स्वरूपा आड बनावट मुखवट्यामागे लपलेलं होतं. त्याचप्रमाणे, आपल्याला बाजारात अनेक आकर्षक वस्तू आढळतात. आपल्याला त्या खरेदी करून घरी आणण्याची इच्छा होते; परंतु जेव्हा आपण त्यांचा वापर सुरू करतो तेव्हा आपल्याला लवकरच लक्षात येते की त्या वस्तू वरून चांगल्या दिसत असल्या तरी त्या कमी दर्जाच्या आहेत आणि म्हणूनच आपण कोणावरही सहज विश्वास ठेवू नये. एखाद्या व्यक्तीशी जवळचे नाते निर्माण करण्यापूर्वी आपण त्या व्यक्तीला जाणून घेण्यासाठी वेळ दिला पाहिजे. तेव्हाच आपण त्या व्यक्तीला पडताळून पाहू शकतो. त्या व्यक्तीच्या गुणांचे मूल्यांकन करू शकतो. त्याचप्रमाणे आपण फक्त चांगली दिसते म्हणून एखादी वस्तू खरेदी करू नये. आपण तिचे मूल्यांकन केले पाहिजे, तिची गुणवत्ता आणि उपयुक्तता तपासली पाहिजे आणि त्यानंतरच आपण ती खरेदी केली पाहिजे.



मनाचा गाभारा

**अर्चना सरोदे**

नोकरी आणि व्यवसायाच्या संधींसाठी आणि जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक क्षेत्रासाठी हे सूत्र वापरले पाहिजे. दूरवरून अनेक गोष्टी चांगल्या आणि आकर्षक वाटत असल्या तरी त्यांचे वास्तव पूर्णपणे वेगळे असते. त्याचप्रमाणे ज्या गोष्टी निकृष्ट दर्जाच्या वाटतात वास्तविक पाहता त्या गोष्टी उच्च दर्जाच्या असतात.

नेहमी हे लक्षात ठेवले पाहिजे की, जे वाईट दिसते ते प्रत्यक्षात चांगले असू शकते आणि जे शाप वाटते ते प्रत्यक्षात वरदान असू शकते. चुकीच्या गोष्टींवर अथवा व्यक्तींवर विश्वास न ठेवण्याची काळजी घेत असताना, हे लक्षात घेतले पाहिजे की योग्य गोष्टी किंवा व्यक्तींवर विश्वास न ठेवणे ही देखील एक सर्वात मोठी चूक असू शकते आणि म्हणूनच जीवनात प्रत्येक गोष्टीचे मूल्यांकन करणे, त्या गोष्टीची गुणवत्ता तपासणे हे अतिशय गरजेचे आहे...

---

# नित्यनेम म्हणजे काय ?

नित्यनेम म्हणजे काय ? नित्याचा जो नियम तो खरा नित्यनेम होय.

नित्य कोण? जो कधीही बदलत नाही तो. याचा अर्थ, जो पूर्ण शाश्वत आहे तोच खरा नित्य होय. म्हणून नित्य म्हणजे भगवंत समजावा. त्याचा नियम करायचा म्हणजे काय करायचे? नियम करणे याचा अर्थ नियमन करणे, निग्रह करणे, वश करून घेणे, स्वाधीन ठेवणे हा होय. आपले मन भगवंताच्या स्वाधीन करणे, त्याच्या ठिकाणी ते नेहमी ठेवणे याचे नाव नित्यनियम होय. आजच्या आपल्या मनाच्या अवस्थेमध्ये ते सर्वस्वी भगवंताच्या स्वाधीन करता येत नाही आणि देह हा जड, अशाश्वत असल्यामुळे देहाने, नित्य आणि शाश्वत अशा भगवंताचा नियम घडणे शक्य नाही. म्हणून देहाने घेता येत असून देहाच्या पलीकडे असणारे आणि सूक्ष्म असल्यामुळे भगवंताशी शाश्वत संबंध असणारे, असे भगवंताचे नाम अखंड घेणे हा आपला खरा नित्यनियम आहे.



अध्यात्म

ब्रह्मचैतन्य

**श्री गोंदवलेकर महाराज**

इतर सर्व गोष्टी, शास्त्राची बंधने, पोथी वगैरे वाचणे, स्नानसंध्यादि नित्यकर्मे वगैरे पाळावी पण त्याचा हट्ट वा आग्रह असू नये. कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे नाम मात्र सोडू नये. एवढाच हट्ट क्षम्य आहे.

शुद्ध भावनेने नाम घेतले की भगवंत दर्शन देतो. शुद्ध भावनेचे फळ फार मोठे आहे. पुष्कळ वेळा गरीब आणि अशिक्षित लोकच या बाबतीत श्रेष्ठ असतात. आपण नाम घेत जावे. नामाने भावना शुद्ध होत जाते. खरे म्हणजे, मनुष्याला जिवंत राहण्यासाठी हवेची जितकी गरज आहे तितकीच, किंबहुना त्याहूनही जास्त जरुरी, परमार्थामध्ये भगवंताच्या नामाची आहे. भगवंताच्या नामाशिवाय न राहण्याचा संकल्प प्रत्येक माणसाने केला पाहिजे. भगवंत हट्टाने किंवा उगीच केलेल्या कष्टाने साध्य होत नाही. तो एका प्रेमाने वश होतो. प्रेमामध्ये हट्ट आणि कष्ट झाले तर शोभतात आणि हिताचे होतात. आपण भक्तांचे प्रेम न पाहता त्यांचा हट्ट आणि कष्ट तेवढे बघतो. जो मनुष्य साडेतीन कोटी रामनामाचा जप करील त्याला भगवंताच्या प्रेमाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही. शंका या फार चिवट असतात, त्या मरता मरत नाहीत. शिवाय, काही शंका आचरणाने आणि अनुभवानेच नाहीशा होतात. म्हणून, मनात शंका असल्या तरी नाम सोडू नये. सतत नाम घेत गेल्याने मन स्वच्छ होत जाते आणि सर्व शंका आपोआप विरून जातात. लंकेमध्ये रावणाच्या बंदिवासात अशोकवनात सीता असताना, तिच्या सान्निध्याच्या प्रभावामुळे तिथली झाडे, पक्षी, दगड या सर्वांना रामनामाचे प्रेम लागले होते, असे वर्णन आहे. रामनामाचे प्रेम आणि भगवंताचे प्रेम ही दोन्ही एकच आहेत. नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे ह्यातच जीवनाचे सर्वस्व आहे.

**तात्पर्य :** ध्रुवासारखी नामावर निष्ठा पाहिजे. प्रत्यक्ष भगवंत समोर आले, तरी त्याने नाम सोडले नाही.

---

# स्तुती

आपल्या जीवनांत परमेश्वराचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. तो आहे म्हणून सर्व चाललेले आहे. तो नाही तर काही नाही ही वस्तुस्थिती आहे. तो दिसत नसला तरी सर्व चाललेले आहे ते त्याच्यामुळे चाललेले आहे. विद्युत ऊर्जा दिसत नसली तरी सर्व चाललेले आहे ते विद्युत शक्तीमुळेच, ती नाही तर सर्व बंद. विद्युत शक्ती, गुरुत्वाकर्षण शक्तीपेक्षा परमेश्वर अनंत पटीने मोठा आहे. इतका तो मोठा असून सुद्धा माझ्यामुळे जग चाललेले आहे असे तो कधीच म्हणत नाही. ज्ञानेश्वरीत सुंदर सांगितलेले आहे,

"आकाशे सर्वत्र वसावे वायूने क्षणभरी उगे नसावे, पावके दहन करावे ही आज्ञा माझी''

आकाशाने सर्वत्र वसावे. वायूने कधीही थांबू नये, वाहत राहावे. अग्नीने दहन करावे, पृथ्वीने भूमात्रांना धरून ठेवावे ही त्याची आज्ञा आहे. आज्ञा माझी म्हणजे काय? सत्ता माझी. सत्ता म्हणजे काय? सत्ता म्हणजे शक्ती, सत्ता म्हणजे असणे. सत्य, सातत्य असणे म्हणजे सत्. ही सत्ता म्हणजे त्याच्या केवळ अस्तित्वामुळे हे सर्व चाललेले आहे. त्याच्या सत्तेने सर्व चाललेले असते पण तो कधीच कुणाला येऊन सांगत नाही की हे मी केले तुम्ही त्याला काहीही केले तरी तो तुमच्या स्तुतीला भाळत नाही. स्तोत्र म्हटले की तो खूश ही तुमची कल्पना आहे. लोक स्तोत्र म्हणतात कारण त्यांना देव प्रसन्न होईल असे वाटते. ते खरे नाही, कारण असा देव प्रसन्न होत नाही. खरेतर तुम्ही देवाची प्रार्थना करता, विश्वप्रार्थना म्हणता, स्तोत्र म्हणता म्हणजे काय करता? देव म्हणजे काय? हे माहीत नसेल तर त्या स्तोत्राला काहीच अर्थ नाही. देव म्हणजे काय हे आधी कळले पाहिजे. "आधी देवासी ओळखावे, मग तयाचे भजन करावे.'' आधी हा शब्द महत्त्वाचा आहे. देवाची ओळख नाही, देवाला कधी पाहिलेले नाही. स्तोत्र म्हणणे चांगलेच, ते वाईट नाही. स्तोत्र म्हणत असताना देवाबद्दल काही माहीत नसेल तर त्या स्तुतीला अर्थ काय? खरा देव कसा आहे हे समजून ते केले पाहिजे. खोटी स्तुती व खरी स्तुती यात फरक आहे. एखादा खरेच चांगले गाणे म्हणत असताना त्याची स्तुती केली तर ती खरी स्तुती पण केवळ त्याला बरे वाटावे म्हणून स्तुती करतो ती खोटी स्तुती. खरी स्तुती व खोटी स्तुती यांत फरक काय? देवाची ओळख झाल्यावर देवाची स्तुती करतो तेव्हा ती देवाला जास्त आवडते. देवाची स्तुती का करायची? देव असा आहे की त्याची स्तुती किती करावी? त्याचे कौतुक किती करावे? त्याच्याबद्दल किती बोलावे? याला काहीही मर्यादा नाहीत. प्रत्यक्षात देव हा आहेच तसा हे मला सांगायचे आहे.



जीवन संगीत

**सद्गुरू वामनराव पै**

---

# पर्णी अलग त्याचा सूर

**'ज्ञानान्वितेषु युक्तेषु**
**शास्त्रज्ञेषु कृतात्मसु।**
**न तेषु सज्जते स्नेहः**
**पद्मपत्रेष्विवोदकम्॥'**



हल्ली जरा वेगळं वाचायची सवय लागलीय म्हणून म्हणा किंवा अध्यात्मिक ओढ म्हणून म्हणा पण, अचानक शेवडे सरांच्या लेखात शौनक ऋषींची 'शौनकगीता' याबद्दल वाचनात आले आणि त्यातीलच हा श्लोक नजरेखालून गेला आणि लक्षात आले, 'जसे कमळाच्या पानांवर पाणी टिकून राहत नाही, तसे ज्ञानवंत, परमात्म्याशी एकरूप झालेले संत, धर्मशास्त्राचे जाणकार आणि मनाने शुद्ध असलेल्या लोकांनाही आसक्तीची बाधा होत नाही.'

मग ही आसक्ती विरहित स्थिती म्हणजेच तरी काय हा प्रश्न सहजच मनात येतोच, तर शुद्ध अध्यात्माचा सर्वोच्च सोपान म्हणजे आसक्ती विरहीत स्थिती होय. अर्थात जगताच्या मोहात न अडकता जे परमात्म्याच्या चरणी लीन झालेले आहेत आणि त्यांची वृत्ती पवित्र कमळाच्या पानासारखी असते, त्यांच्यावर सांसारिक आसक्तीचे जल हे टिकत नाही. पण जर 'हे जग क्षणभंगुर आहे तसेच जे काही आहे, ते परमेश्वरच आहे आणि मनुष्य त्याच्या इच्छांनी आणि वासनांनी बांधला गेला की त्याचे खरे स्वरूप हरवते' हे जर खरे आहे तर मग याचा अर्थ असा नाही की त्या आत्म्याला मुक्ती नाही. प्रत्येकाला आत्मज्ञानाची वाट खुली असते.

अर्थात आत्मज्ञानाची वाट म्हणजे स्वतःला ओळखणे, स्वतःच्या अंतरात्म्याशी संवाद साधणे. जो मोहाचा त्याग करून हे सत्य शोधतो, तो स्वतःला आणि जगाला नव्या नजरेतून पाहतो. त्याचेच जीवन हे निखळ तर होतेच शिवाय मन ही शांत होते आणि अखेरीस तो फक्त बाह्य सुखांचा गुलाम राहात नाही आणि खऱ्या आनंदाचा साक्षात्कार घेतो. अर्थात याच्या पुढचा टप्पा म्हणजे मुक्ती आणि मनशांती की जी मिळवणे दुरापास्तच, पण जो स्वतःला ओळखतो, तो कोणत्याही बाह्य परिस्थितीने विचलित होत नाही. त्याचा प्रवास सुख आणि दुःख यांच्या पलीकडे जातो आणि तो शाश्वत सत्याशी एकरूप होतो. मग त्याचे जीवन याच तत्वज्ञानाचे प्रकटीकरण होते.

अर्थात हे प्रकटीकरण इतके सोपे नाहीच. सर्वच प्राणीमात्रांच्या जीवनात असंख्य मोह आणि आकर्षण येतात, पण जो त्यापासून मुक्त होतो, तोच खऱ्या ज्ञानाचा अधिकारी ठरतो. मग अशा जीवनक्रम करणाऱ्या मानवाचे जीवन ही भक्तिरस आणि आत्मज्ञान हेच अंतिम सत्य आहे.

आता वरील श्लोकाबद्दलच बोलायचे झाले तर सर्वच संतांच्या वचनांमध्ये एक गूढ आहे की जे, त्यांनी स्वतःच्या अनुभवातून सांगितले की, मोहमयी जगताची आसक्ती ही जसे कमळाच्या पानावर टिकू शकत नाही, तसेच ज्यांनी आत्मज्ञान प्राप्त केले आहे, त्यांना या जगाची आसक्ती कधीही स्पर्श करू शकत नाही. त्यामुळे आपणही त्यांच्या विचारांची कास धरून आपले जीवन शुद्धतेकडे नेले पाहिजे.



ऋतुराज

**ऋतुजा केळकर**

कसं आहे ना की, आत्मज्ञानाच्या दिव्य प्रकाशात मन निर्मळ होते आणि मोहाचे काळे ढग दूर होत जातात. ज्यांनी सत्याचा साक्षात्कार घेतला, त्यांना सांसारिक आसक्तीचा लवलेशही लागत नाही. ते नित्यमुक्त असून त्यांचे चित्त स्थिर, विचार शुद्ध आणि जीवन निर्मळच असते. जगातील मोह, माया आणि आकर्षण हे फक्त धुक्याचे आभास आहेत. जीवनाची पायवाट धूसर होत गेली की, स्मरणांची सावली मागे रेंगाळत राहते आणि क्षणभंगुरतेच्या धुक्यात हरवलेले आपलेच अस्तित्व आणि ओळखीचे चेहरे विरले की अगदी शब्द देखील अनामिक होतात आणि मग वासनांच्या सावल्यांत कोरडे पडलेले स्पर्श हे क्षितिजाच्या काठावर उभे राहून उरते ती फक्त नजरेत विरलेली चाहूल. मोहाच्या अभ्रांत चित्रात हरवलेली वाट पोहचते मोहाच्याच धूसर कवडशांत रूपांतरीत होऊन आणि हरवल्या आपल्या अस्तित्वाच्या सावलींत विरलेली वाट परत पोहोचते विस्मरणाच्या ओलसर धुक्यात लुप्त, पायवाट बनून आत्मज्ञानरूपी सूर्याच्या तेजाच्या दिशेने, त्यांना या धुक्याचा प्रभाव होत नाही. जसे कमळाच्या पानावर पाणी पडले तरी ते त्यावर टिकत नाही, तसेच आत्मज्ञानी पुरुष सांसारिक बंधनांपासून अलिप्त राहतात. त्यांच्या मनातील विचार शुद्ध, निर्मळ आणि निर्लेप असतात.



कसं आहे ना की, मोह आणि माया हे माणसाला कधीही शांत बसू देत नाहीत. एका इच्छेमधून दुसऱ्या इच्छेचा जन्म हा होतच राहतो आणि मग जीवनभर याच प्रवासात माणूस अडकतो. त्याला वाटते की, कोणत्या तरी वस्तूने त्याचे सुख पूर्ण होईल, पण तो जसे पुढे जातो, तसे नवनवीन इच्छांच्या साखळ्या त्याला अडकत असतात. पण जो आत्मज्ञानी आहे, तो या भ्रमाच्या जाळ्याला भेदतो. त्याला आनंद बाहेरून शोधावा लागत नाही. जीवनात कितीही वैभव असो, कितीही सुखसंपत्ती असो, तरी त्यांचा प्रभाव शुद्ध आत्म्याला पडत नाही. तो त्यांच्याशी एकरूप होत नाही, कारण त्याला त्यांचे खरे स्वरूप समजले आहे. या जगातील मोह आणि सुख यांचे अस्तित्व अस्थायी आहे आणि त्यांना टिकवण्याचा प्रयत्न करूनही उपयोग नाही. आत्मज्ञानी माणूस या सत्याला ओळखतो आणि तो सदा मुक्त राहतो.

म्हणूनच जे शुद्ध अंतःकरणाचे आहेत, त्यांचे जीवन या जगाच्या क्षणभंगुर सुखांपेक्षा अनंततेच्या आनंदात विलीन झाले आहे. त्यांना मान–अपमानाचा परिणाम होत नाही, ना त्यांना धनाची हाव असते. आत्मज्ञानाची वाट ही मोहाच्या विरुद्ध जाते. या वाटेवरून चालणाऱ्या माणसाला हे जग फसवू शकत नाही. तो संसाराच्या मोहात अडकत नाही, कारण त्याच्या डोळ्यांसमोर दिव्य ज्ञानाचा प्रकाश आहे. त्याच्या आत्म्याच्या गाभ्यात निखळ सत्याचे तेज आहे. असे जीवन हेच जीवनाचे सर्वोच्च सार आहे, अखेरीस माझ्याच शब्दात सांगायचे झाले तर,

**मोह फुलावा स्वप्नसंगती...**
**स्पर्श तयांचे क्षणभंगुर।**
**स्मरण उरी धुक्याचे कवडसे...**
**पर्णी अलग त्याचा सूर॥**

# अपघात स्थळ काढण्याची मागणी

## ॲड संजय काळे | प्रशासनाला दिले निवेदन

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:राष्ट्रीय महामार्ग समिती गेवराई २०२१ पासून शहागड ते बीड राष्ट्रीय महामार्गा वरिल व गेवराई शहरातील दोन्ही एंट्री पॉइंट वरील अंडरपास साठी मागणीसाठी आंदोलन व ही केले आहे .त्यावर केंद्रीय परिवहन मंत्री मा. ना नितीनजी गडकरी साहेबांनी आदेश दिल्याने गेवराई शहरातील बीड व छत्रपती संभाजी नगर एंट्री पॉइंट वर अंडरपास व ओव्हर ब्रीज मंजुर होउन सदरील काम ागस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचे राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण ने समिती स लेखी कळविले आहे. परंतू शहागड बीड महामार्गावर तयार झालेले अपघात स्थळ तथा ब्लॅक स्पॉट प्राधिकरण अथवा आय आर बी ने काढले नसल्याने २६ मे रोजी ची अपघात होउन ६ युवक मृत्यूमुखी पडल्याचा आरोप राष्ट्रीय महामार्ग समिती गेवराई चे अध्यक्ष व भाजप नेते ॲड संजय भाऊ काळे यांनी केला व त्यात प्राधिकरण व आय आर बी ने अक्षम्य दूर्लक्ष केल्याचे ड.संजयभाऊ काळे म्हणाले व त्या संदर्भात त्यांनी व समिती ने मा पोलीस अधीक्षक नवनीत कमावत साहेब व मी. जिल्हाधिकारी बीड यांची भेट घेवून लेखी निवेदन दिले.यछत्रपती संभाजी नगर सोलापूर महामार्गावर शहागंज बीड महामार्गावर असलेले अपघात स्थळ काढण्यासाठी व २६ मे रोजी गढी येथिल अपघातात झालेल्या सहा मृत्यू ची जबाबदारी निश्चित करण्यात यावी या मागणीसाठी आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला .




धुळे सोलापूर महामार्गा काम दर्जा, तांत्रिकदोष , भ्रष्टाचार,अपघात चे कारण तपासणी साठी उच्च स्थरीय समिती स्थापन करण्यात यावी. समिती मध्ये सी पी डब्ल्यु डी क्वालिटी कंट्रोल , पी डब्ल्यु डी क्वालिटी कंट्रोल , पोलीस अधीक्षक सीबीआय ॲंटी करप्शन ,पोलीस अधीक्षक बीड, जिल्हाधिकारी बीड राष्ट्रीय महामार्ग समिती गेवराई यांचा समावेश असवा. गढी येथिल अपघातात ६ मृत्यू का जबाबदार धरुन प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजी नगर व सर्व संचालक आय आर बी यांचेवर सदोष मनुष्य वधाचा खटला नोंदवावा.

राष्ट्रीय महामार्ग सोलापूर धुळे वर दारू तपासणी कडक करून कारवाई करण्यात यावी. सदरील मागण्यांवर तात्काळ कारवाई व्हावी अन्यथा बेमुदत पान २ वर

# महाआवास योजनेत पाथर्डी प्रथम

### अभिनंदनिय:बीडीओ शिवाजी कांबळेंचे उत्कृष्ट नियोजन



पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी:प्रधानमंत्री महा आवास योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात ग्रामीण विभागात पाथर्डी तालुक्याने प्रथम क्रमांक पटकावला असून गटविकास अधिकारी शिवाजीराव कांबळे यांनी प्रभावी नियोजन करून पाथर्डी पंचायत समितीला प्रथम क्रमांक मिळवून दिला आहेपुणे येथे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पाथर्डी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवाजीराव कांबळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला

पाथर्डी तालुक्यातील एकही गरीब कुटुंब एकही वंचित राहणार नाही याची दक्षता आम्ही घेत आहोत या योजनेच्या संरक्षणाला एक महिना मुदतवात मिळाले असून नवीन ७ घरकुले पान २ वर

# खेड्यात अवैध दारू विक्री जोमात?

### चर्चा:वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये अवैध दारू विक्री केली जाते परंतु कार्यवाही केली जात नाही दारुबंदी विभागाचे अधिकारी झोपले आहेत का असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण दारु बंदी विभागाची कारवाई केल्याचे कधी दिसुन येत नाही दारु बंदी विभागाचे अधिकारी काय फक्त नावालाच आहेत का व शासनाच्या पगारावर मजा मारायला आहेत का असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण केज तालुक्यातील अनेक खेड्यात अवैध दारू विक्री केली जाते जसे की मुंडेवाडी,काळेगाव,पींप्री ,सारूकवाडी,आनंदगाव सारणी,युसुफवडगाव सर्कल, चिंचोली माळी, असे अनेक खेड्यात अवैध दारू विक्री केली जाते परंतु दारु बंदी विभागाचे अधिकाऱ्यांची अनेक वर्षे झाले केज तालुक्यात कुठल्याही प्रकारची कार्यवाही केली नाही किंवा निदर्शनास आले नाही मग दारू बंदी विभागाला काय लाचलुचपत करुन गप्प बसनारा विभाग म्हणाव का झोपेचे सोंग घेऊन गप्प बसणारे विभाग म्हणाव का हप्ता घेऊन गप्प बसणारे विभाग म्हणाव लागेल असा प्रश्न नागरिकांना पडला पान २ वर

# बीड जिल्हा सहकार बोर्डाच्या निवडी

### अभिनंदनिय:अध्यक्षपदी रामकृष्ण बांगर तर उपाध्यक्षपदी सुहास पाटील

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्हा सहकार बोर्डाच्या कार्यालयात दि. ४ जून रोजी नवनिर्वाचित संचालक मंडळांची सभा पार पडली. यावेळी बीड जिल्हा सहकार बोर्डाच्या अध्यक्षपदी सहकार महर्षी मा रामकृष्ण बांगर तर उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक मा सुहास पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री.ए टी सानप साहेब यांनी काम पाहिले. त्यांना बीड जिल्हा सहकार अधिकारी श्री आर.डी. वाघमारे साहेब यांनी सहाय्य केले.बीड जिल्हा सहकार बोर्ड लि.बीड च्या संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच पार पडली. नवनिर्वाचित संचालका मधून अध्यक्ष ,उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली .या सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाचा



कार्यकाळ २०२५ ते २०३० असा राहणार आहे. निवडीनंतर सर्व संचालकांनी अध्यक्ष ,उपाध्यक्ष यांचे अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी ज्येष्ठ संचालिका धडाडीच्या नेत्या सुशिलाताई मोराळे, ज्येष्ठ मा.संचालक मा कल्याण काका आखाडे, मा कैलास माने, मा पठाण नसीर खाँ दौलत खाँ, मा भगवान पाखरे, मा महादेव तोंडे, मा अश्रुबा आंधळे, राज्य सहकारी संघाच्या माजी संचालक सौ .संगीता पोकळे, मा अच्युत शिंदे, सौ. तारामती बांगर, सौ.किसकिंदा जाधव, मा किशोर राऊत, मा बाबासाहेब नागरगोजे , मा भुजंगराव आंधळे या नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार करण्यात आला. सहकारी कायद्याचे शिक्षण, प्रशिक्षण व प्रसिद्धी या संचालक मंडळाच्या वतीने बीड जिल्ह्यामध्ये चांगल्या प्रकारे करण्यात येईल. असे मत यावेळी चेअरमन रामकृष्ण बांगर यांनी व्यक्त केले. लवकरच जालना रोडवर सहकार बोर्डाच्या स्वतंत्र इमारतीसाठी जागा घेण्याचेही यावेळी चेअरमन बांगर यांनी सांगितले. राज्य सहकारी संघातर्फे बीड जिल्हा बोर्डाच्या कार्यक्रमासाठी स्वतंत्र निधी देण्यात येणार असल्याचेही चेअरमन रामकृष्ण बांगर यांनी सांगितले. पान २ वर

# राष्ट्रवादीचा पुणे येथे वर्धापन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण मा. खा.श्री शरदचंद्र पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार दि. १० जून २०२५ रोजी वर्धापन दिन कार्यक्रम आयोजित केला आहे. जिल्ह्यातील मान्यवर नेते व पदाधिकारी निमंत्रित आहेत. अशी माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा २६ वा वर्धापनदिन १० जुन २०२५ सकाळी १० वा.



बालगंधर्व रंगमंदिर नाट्यगृह शिवाजीनगर पुणे येथे संपन्न होणार आहे. या वर्धापन कार्यक्रमासाठी पक्षाचे विद्यमान–खासदार आमदार, माजी खासदार माजी आमदार, सर्व प्रदेश पदाधिकारी, सर्व जिल्हा निरीक्षक, जिल्हाध्यक्ष– कार्याध्यक्ष, सर्व फ्रंटचे अध्यक्ष व सेल राज्य प्रमुख,तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, तसेच २०२४ निवडणुकीतील लोकसभा व विधानसभा उमेदवार, पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या पान २ वर

# बस थांब्यासाठी वेळापत्रक

### दिलासा: विद्यार्थ्यांसह प्रवाशांना झाली सोय



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:पाटोदा शहरापासून अवघ्या १० ते १२ किमी अंतरावर असलेल्या कुसळंब फाटा (वाजंरा फाटा) येथे नव्याने बस थांबा मंजूर करण्यात आला असून, येथून बीड डेपोच्या बससेवेला अधिकृत सुरुवात झाली आहे.या उपक्रमामागे मा.आमदार सुरेश धस( आण्णा )यांचे विशेष प्रयत्न असून, त्यांच्या पुढाकारातून हा थांबा मंजूर झाला आहे.बीड डेपोचे नियंत्रक यांच्यामार्फत येथील बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे.प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांना वेळापत्रकानुसार प्रवास करण्याचे आवाहन मा.सुरेश अण्णा धस मित्र मंडळाच्या वतीने मा. माऊली (आप्पा) जरांगे यांनी केले आहे.थांब्याचे महत्त्व परिसरातील नागरिकांना प्रवासासाठी मोठी सुविधा वेळ आणि खर्चात बचत शालेय व कार्यालयीन प्रवाशांसाठी फायदेशीर स्थानिक नागरिकांचे अभिप्राय या थांब्यामुळे आता गावकऱ्यांना पाटोदा आणि बीडकडे जाणे अधिक सुलभ झाले आहे.आमदार धस साहेबांचे आभार स्थानिक रहिवासी प्रवाशांनी विनंती आहे की, नवीन वेळापत्रकानुसार प्रवासाची आखणी करून सुविधा उपभोगावी होईल.

# पर्यावरण दिनानिमित्ताने वृक्ष लागवड

### धोरण:श्री पार्डीकर महाविद्यालयाने राबविला उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

सिरसाळा: दिनांक ५ जून २०२५ वार गुरुवार रोजी श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ के.के. पाटील तसेच माजी प्राचार्य डॉ. एच.पी. कदम हे उपस्थित होते .

याप्रसंगी महाविद्यालयामध्ये वृक्ष लागवड करण्यात आली . माजी विद्यार्थी अतुल कराड यांची जिल्हा परिषद शिक्षक पदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे व माजी विद्यार्थी संघामार्फत पुष्पहार व पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी अतुल कराड, बालाजी देशमाने, बाळासाहेब शिंदे तसेच विलास बनसोडे सर यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा दयानंद झिंजुर्डे प्रा डॉ ज्ञानेश्वर मस्के व विद्यार्थी उपस्थित होते.



# ड्रीम वर्क्स रिअल्टर्सकडून पर्यावरण दिन

### उपक्रम:दीर्घकालीन बांधिलकीसह अनोखी वृक्षारोपण

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून, ड्रीम वर्क्स रिअल्टर्सने बालेवाडी येथे एक अनोखी आणि दीर्घकालीन वृक्षारोपण मोहीम राबवली. रुटींग फॉर ग्रीनर टुमारो (ठौंळपस षी र त्रीशशपशी ढ्ढौीु) या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम केवळ प्रतिकात्मक नसून, पर्यावरणीय शाश्वततेसाठी एक ठोस पाऊल आहे. सदर कार्यक्रम मा. नगरसेवक अमोल बालवडकर, कामगार नेते श्री जालिंदर बालवडकर, श्री. दिलीप बालवडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व ड्रीम वर्क्स रिअल्टर्स परिवाराच्या सहभागातून संपन्न झाला.

या मोहिमेअंतर्गत १०० हून अधिक झाडांची लागवड करण्यात आली असून, प्रत्येक झाड दोन कर्मचाऱ्यांच्या जोडीकडे सुपूर्त करण्यात आले आहे. प्रत्येक झाडाला एक वैयक्तिक नाव देण्यात आले असून, जलरोधक फलकासह त्याचे दस्ताऐवजीकरणही करण्यात आले आहे. ही अभिनव संकल्पना कर्मचाऱ्यांमध्ये निसर्गाशी नातं निर्माण करते, तसेच दीर्घकालीन जबाबदारीची भावना वाढवते.ड्रीम वर्क्स रिअल्टर्सने या उपक्रमासाठी कार्यविभागाची स्पष्ट रचना आखली आहे. नियमित पाणीपुरवठा आणि पर्यावरणीय सहाय्य कंपनीकडून करण्यात येणार असून, खत व्यवस्थापन आणि झाडांची आरोग्य तपासणी ही जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यांवर असेल. प्रत्येक रोपाची वाढ आणि जोपासना ही दीर्घकालीन पद्धतीने केली जाणार आहे.कार्यक्रमात बोलताना ड्रीम वर्क्स रिअल्टर्सचे पान २ वर



## जागतिक पर्यावरण दिन | स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या हस्ते झाले वृक्षारोपन

# वृक्षसंवर्धन प्रत्येकाचे कर्तव्य–न्या.राजश्री परदेशी

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:तालुका विधी सेवा समिती व माजलगाव तालुका विधीज्ञ संघाच्या संयुक्त विद्यमाने माजलगाव न्यायालयाच्या परिसरात आज रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश राजश्री परदेशी यांनी स्वच्छता कर्मचा–यांच्या हस्ते वृक्षारोपन करुन एक आदर्शवत संदेश त्यांनी दिला. यावेळी कार्यक्रमास मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर एस.एस. बुद्रूक, मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर आर.बी. पौळ, मा. दिवाणी न्यायाधीश जी.एस. खुपसे, सरकारी वकिल आर.ए. वाघमारे, विधीज्ञ संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी व विधीज्ञ बांधव मोठया संख्येने हजर होते.



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त माजलगाव न्यायालयाच्या परिसरात वृक्षारोपनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश राजश्री परदेशी या होत्या तर कार्यक्रमास मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर एस.एस. बुद्रूक, मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर आर.बी. पौळ, मा. दिवाणी न्यायाधीश जी.एस. खुपसे, सरकारी वकिल आर.ए. वाघमारे, विधीज्ञ संघाचे उपाध्यक्ष एम.एन. जाधव, सचिव एन.एस. तेलघड, कोषाध्यक्ष पी.आर. खेत्री, ज्येष्ठ विधीज्ञ वाय.बी. मुंडे, टी.एन. कोल्हे, व्ही. व्ही. फपाळ, ए.ए. शिंदे, व्ही.बी. कदम, बी.एस. घनघाव, आर.आर. राठोड, डी.बी. आडे, आर. आर. साबळे, एस.डी. कांबळे, सातपुते, डी.जी. जाधव, एस.एस. मुंडे, टी.पी. रेडे, ए.डी. मुंडे, पी.के. कुलकर्णी, बी.पी. शिंदे, विधीज्ञ बांधव व न्यायालयातील कर्मचारी बांधव यावेळी मोठया संख्येने हजर होते. वृक्षारोपन कार्यक्रमाच्या वेळी मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र पान २ वर

# आवास योजनेसाठी नवीन उद्दीष्ट

### आ.संदिप क्षीरसागर:पात्र लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी तब्बल १२०२७ तर शिरूर कासार तालुक्यासाठी ४७९० घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातील निकषपात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



स्वतःचे पक्के घर नसलेल्या कुटूंबांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. यावेळेस बीड मतदारसंघातील बीड व शिरूर कासार तालुक्यासाठी भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. तसेच घरकुल प्रक्रिया पान २ वर